संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 10 | Marathi Monthly | Thane, 1 April 2025 to 30 April 2025 | Pages 16 | Price : 10/-

# रायगड जिल्ह्यात 'धर्मराज्य पक्षा'चा अश्वमेध उधळला...

## रोह्यातील डीआरटी ॲंथिया कंपनीत, राजन राजेंच्या 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ची स्थापना




''भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी हरित-पक्ष'' अशी सर्वमान्य ओळख असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'चा अश्वमेध आता, शिवछत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि हिंदवी-स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात उधळला असून, रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसीमधील डीआरटी ॲंथिया अरोमा केमिकल्स प्रा. लि. या कंपनीतील सर्वच्या सर्व कामगारांनी कामगार-हृदयसम्राट मा. राजन राजे यांच्या अध्यक्षतेखालील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सदस्यत्व स्विकारले आहे. यासंदर्भात, कंपनीच्या युनिट-१ आणि युनिट-२ या दोन्ही ठिकाणच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ युनियनच्या नामफलकाचे अनावरण शनिवार, दि. १ मार्च-२०२५ रोजी, मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाले.

''भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी हरित-पक्ष'' अशी सर्वमान्य ओळख असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'चा अश्वमेध आता, शिवछत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि हिंदवी-स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात उधळला असून, रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसीमधील डीआरटी ॲंथिया अरोमा केमिकल्स प्रा. लि. या कंपनीतील सर्वच्या सर्व कामगारांनी कामगार-हृदयसम्राट ...पृष्ठ क्र. ४ वर

## औरंग्याची कबर उखडून टाकाच, पण....

सध्या महाराष्ट्रात इतर सर्व जीवनावश्यक मुद्दे झाकण्यासाठी अनावश्यक मुद्दे कसे चर्चेत राहतील याचाच प्रयत्न सत्ताधारी करताना दिसतात. औरंगजेब क्रूर होताच. छत्रपती शिवरायांचा आणि स्वराज्याचा शत्रू होताच. त्याने स्वराज्याला आणि छत्रपती शिवरायांना प्रचंड त्रास दिला, त्यांचा अपमान केला. म्हणून जर औरंगजेबाची कबर उखडून टाकायची असेल तर, छत्रपती शिवरायांविरोधात लढणाऱ्या, त्यांना त्रास देणाऱ्या, त्यांच्या जिवंतपणी आणि त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांचा अपमान करणाऱ्यांचाही आढावा आपल्याला घ्यावाच लागेल. ...पृष्ठ क्र. ५ वर

# स्टॅंडअप कॉमेडियन कुणाल कामरावर काय न्यायालयीन कारवाई करायची असेल ती करा...

## पण, कायदा हातात घेणाऱ्यांचे हात कायद्यानेच 'कलम' लावून 'कलम' करा....

कुणाल कामरा यांच्या कार्यालयाच्या तोडफोड-प्रकरणी ''तोडलं त्याचं समर्थन करत नाही'', असं मंत्री उदय सामंतांचं म्हणणं असेल; तर, त्या संबंधितांना तत्काळ नुकसानभरपाई कधि दिली जाणार? नागपूर-दंगलप्रकरणी विद्युतवेगाने नुकसानभरपाईची कारवाई करु पहाणारे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री याप्रकरणी, नुकसानभरपाई देण्याची कधि तत्परता दाखवणार की, नेहमीप्रमाणेच अशा ठिकाणी कच खाणार? निलेश राणे, भरत गोगावले जर टीव्हीवर येऊन उघडपणे हिंसाचाराचं समर्थन करणार असतील...तर, त्यांच्यावरही मुख्यमंत्री कायदेशीर कारवाई कधि करणार की, तेवढी राजकीय-हिंमत त्यांच्यात नाही?? ...पृष्ठ क्र. २ वर



## अंतरंग



कंत्राटी गुलामगिरीचा पगारवाढीच्या मलमपट्टीने फसवणूक!
*...राजन राजे*
पृष्ठ क्र. ८



मराठी मुस्लीम संस्कृतीवरील, उत्तरभारतीय घाला!
*- कलीम अज़ीम*
पृष्ठ क्र. १४




जन सुरक्षा नव्हे सजग जनांना शिक्षा
*- जगदीश काबरे*
पृष्ठ क्र. १३

अध्यक्ष महोदय, यांच्यावर काय कारवाई झाली?
*- सूरज सामंत*
पृष्ठ क्र. १६

# ठाण्यातील रुग्णालयांकडून शासकीय आदेशाची पायमल्ली

## रुग्णहक्क सनद आणि दरपत्रक जाहीर न केल्याने रुग्णांची होतेय घोर फसवणूक

**ठाणे (प्रतिनिधी) : रुग्णसेवा हीच ईशसेवा ही संकल्पना दृढ असणाऱ्या आणि डॉक्टरांना देव मानणाऱ्या आपल्या समाजात, गोरगरीब रुग्णांची घोर फसवणूक होत असल्याचा निंदनीय प्रकार, सांस्कृतिक उपराजधानीचा दर्जा असलेल्या ठाणे शहरात घडत असून, शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये दरपत्रक लावण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी निर्देश देऊनही, ठाण्यातील बहुतांश रुग्णालयांमध्ये अद्यापपर्यंत रुग्णहक्क सनद आणि दरपत्रक लावण्यात आलेले नसल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.**



'धर्मराज्य पक्षा'चे माहितीचा अधिकार ठाणे कक्षप्रमुख अनिल महाडिक यांनी, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे लेखी तक्रार

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात, आरोग्य विभागाच्या नोंदणीनुसार एकूण ३७६ शासकीय व खासगी रुग्णालये नमूद आहेत. शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये, रुग्णांच्या हक्काची सनद आणि दरपत्रक, दर्शनी भागात लावणे हे, शासकीय आदेशानुसार बंधनकारक असताना, ठाणे शहरासहित ठाणे जिल्ह्यात मात्र, त्याची कोणतीही अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. याच पार्श्वभूमीवर, 'ह्युमन राईटस् असोसिएशन फॉर प्रोटेक्शन' या संघटनेचे माहिती आणि जनसंपर्क अधिकारी तसेच, 'धर्मराज्य पक्षा'चे माहितीचा अधिकार ठाणे कक्षप्रमुख अनिल महाडिक यांनी, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यावर अपर जिल्हादंडाधिकारी डॉ. संदीप माने यांनी, ठाणे महानगरपालिका आयुक्त आणि ठाणे जिल्हा शल्य चिकित्सक यांना पत्र लिहून, ठाणे जिल्ह्यातील व ठाणे महानगरपालिका हद्दीतील, शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये, रुग्णांच्या हक्काची सनद व दरपत्रक दर्शनी भागात लावण्याबाबत,

वारंवार पत्रव्यवहार होऊनही, संबंधित रुग्णालयांवर, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, कायदे व नियमांच्या आधारे चौकशी करुन कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, **जनतेचे मानवी हक्क जोपासण्यासाठी, राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या वतीने, सर्वांगीण मार्गदर्शिका प्रस्तुत करण्यात आली होती व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व संस्थांना निर्देशित करण्यात आले की, आरोग्य विभागामार्फत कोणत्याही प्रकारे शासकीय व खासगी तसेच, ठाणे महानगरपालिकेच्या कोणत्याही रुग्णालयांत, रुग्णांच्या हक्काची सनद आणि दोरपत्रक लावल्याचे कुठेही दिसून आलेले नाही. एकप्रकारे ही शासकीय आदेशाची पायमल्ली असून, यासंदर्भात सखोल चौकशी करुन, दफ्तर दिरंगाई कायद्यानुसार, संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येऊन, त्यांच्या सेवापुस्तिकेत तशी नोंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

खासगी रुग्णालयांमधील औषधोपचार परवडत नसल्याने, गोरगरीब आणि कष्टकरी जनता, शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार घेत असते; मात्र, तिथेही रुग्णांचे हक्क पूर्णपणे डावलण्यात येऊन, करदाते असूनही त्यांना सन्मानाची वागणूक मिळत तर नाहीच, उलट रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याचे सांगून, बाहेरील औषधे आणण्याची सक्ती केली जाते. तर, खासगी रुग्णालयांत अव्वाच्या सव्वा दर आकारुन कष्टकरी रुग्णांची आर्थिक पिळवणूक केली जाते. ही बाब निदर्शनास येताच, अनिल महाडिक यांनी, याप्रकरणी वर्ष-२०२२ पासून महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा सुरु केला होता. परंतु, तीन वर्षे उलटूनही आणि शासनाचे निर्देश असतानाही, ठाण्यातील शासकीय आणि खासगी रुग्णालयांकडून त्यासंदर्भात अद्यापपर्यंत अंमलबजावणी होत नसल्याने, गोरगरीब रुग्णांच्या होऊ घातलेल्या घोर सरकारी फसवणुकीविरोधात. आपण लवकरच जनहित याचिका दाखल करणार असल्याचे अनिल महाडिक यांनी, आपल्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

---

## पण, कायदा हातात घेणाऱ्यांचे हात कायद्यानेच 'कलम' लावून 'कलम' करा....

...पृष्ठ क्र. १ वरुन

हात धरलेला आहे; उद्या तो तुमच्या माथी ठेवला जाणार आहे...नव्हे, तसा तो ठेवला जावाच, हीच ईशरचरणी आमची प्रार्थना आहे. गीता तुम्ही नीट वाचली असेल तर, देवेंद्रजी, नियती कोणाला सोडत नसते, हे विसरु नका!

''आम्ही काय वाटेल ते बरळू, वाटेल ते करु... कोण अडवणार आम्हाला''...ही जर भाजप, शिंदेसेनेच्या गुंडसेनेला मस्ती आली असेल...तर, ती मस्ती उतरविण्याची ताकद, ही शिवछत्रपतींच्या महाराष्ट्राची पावन-पवित्र भूमी बाळगून आहेच... अरे, तुम्ही करुन करुन तिला किती अपवित्र कराल? शिवछत्रपतींची काय किंवा म. गांधी, पं. नेहरुंची काय...या सगळ्यांची पुण्याई कळीकाळाला पुरुन उरणारी आहे.

तुम्हा लोकांचा वारसा, हा कधिच शिवछत्रपतींचा नव्हता...तो नेमका कुणाचा, ते तुम्हीच वरचेवर सिद्ध करत असता आणि त्याचीच 'कबर' खोदण्याची भाषा करता? आताही, तेच केलंयत तुम्ही!

शिवछत्रपतींचा व छ. संभाजी महाराजांचा घनघोर अवमान-अपमान करणाऱ्या काळी टोपीछाप राज्यपाल कोश्यारीपासून कोरटकरपर्यंत...कुणाच्याच विरोधात या गुंडपुंडांचं रक्त कसं कधि खवळलं नाही?

**''सापाच्या शेपटीवर पाय देऊ नका'' म्हणणारे ठाण्याचे बिनकण्याचे खासदार नरेश म्हस्के, स्वतःला व आपल्या संघटनेला, स्वतःच 'साप' म्हणून संबोधतायत...हे देखील भान गुंडगिरीचं समर्थन करताना, या महाभागांना राहीलेलं नाही... धिःक्कार असो, धिःक्कार असो!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## कुणाल कामरानं गायलेलं गाणं

*ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी, आँखो पे चष्मा... हाये...*
*ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी, आँखो पे चष्मा... हाये...*
*एक झलक दिखलाए कभी,*
*गुवाहाटी में छिप जाये...*
*मेरी नजर से तुम देखो,*
*गद्दार नजर वो आए...*
*ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी,*
*आँखो पे चष्मा... हाये...*
*मंत्री नहीं वो दलबदलू है,*
*और कहा क्या जाये...?*
*जिस थाली में खाए,*
*उसमें ही वो छेद कर जाए...*
*मंत्रालय से ज्यादा फडणवीस की गोदी में मिल जाए...*
*तीर कमान मिला है इसको, बाप मेरा ये चाहे...*
*ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी, आँखो पे चष्मा... हाये...*



समाजमाध्यमातून साभार

# हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेटच्या विरोधात, 'धर्मराज्य पक्षा'ची ठाणे आरटीओ कार्यालयाबाहेर निदर्शने!






**ठाणे (प्रतिनिधी) : केंद्र सरकारच्या आदेशानुसार, महाराष्ट्र शासनाने राज्यातील वर्ष-२०१९ पूर्वी खरेदी केलेल्या जुन्या वाहनांना, अत्याधुनिक अशी उच्च सुरक्षा असणारी, हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट (HSRP) दि. ३० एप्रिल-२०२५ रोजीपर्यंत बसविणे अनिवार्य केलेले आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून तीन कंपन्यांना वाढीव दराने टेंडर्स देण्यात आलेली आहेत. मात्र, भारतातील इतर राज्यातील दर आणि महाराष्ट्रातील दर यामध्ये फार मोठी तफावत असल्याचे आढळून आलेले आहे. यातून वाहनधारक नागरिकांची फार मोठी लूट होऊन, त्यांची आर्थिक फसवणूक होऊ घातलेली आहे. याचाच निषेध करण्यासाठी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, दि. ६ मार्च-२०२५ रोजी, आंदोलन करण्यात आले.** केंद्र सरकारच्या सुचनेनुसार, महाराष्ट्र शासनाने जारी केलेले दर हे दुचाकीकरिता, ४५०रु. तर, चारचाकी वाहनांकरीता ७४५रु. इतके आहेत. परंतु, शेजारच्या गोवा आणि गुजरात राज्यात मात्र, अनुक्रमे दुचाकीकरीता, १५५रु. आणि ३००रु. तर, चारचाकी वाहनांकरीता, २०३रु. आणि ४६०रु. इतके ठेवण्यात आलेले आहेत. दरम्यान, संपूर्ण भारतातील राज्यांच्या तुलनेत, महाराष्ट्र राज्य हे, करांच्या माध्यमातून, सर्वात जास्त निधी, केंद्र शासनाच्या तिजोरीत जमा करीत असतानादेखील, महाराष्ट्रातील वाहनधारक नागरिकांना मात्र, हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन (HSRP) नंबरप्लेटच्या माध्यमातून आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार असल्याने, 'धर्मराज्य पक्षा'ने तीव्र शब्दांत आपला निषेध व्यक्त केला आहे. **शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या दरपत्रकानुसार, भारतातील इतर राज्यांना झुकते माप देऊन, महाराष्ट्र राज्यातील नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच हा प्रकार असून, याबाबत 'धर्मराज्य पक्षा'च्या भावना अतिशय तीव्र असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. याचसंदर्भात, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या उपायुक्तांना यावेळी निवेदन देण्यात येऊन, हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन (HSRP) नंबरप्लेटच्या वाढीव आणि अन्यायकारक दरपत्रकाचा लोकशाही व सनदशीरमार्गाने निषेध व्यक्त केलेला असून, आपण आमच्या भावना, महाराष्ट्र शासनापर्यंत पोहोचवाव्यात अशी विनंती 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या उपायुक्तांना निवेदनामार्फत करण्यात आली.** यावेळी पक्षाचे सहसचिव नरेंद्र पंडित, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर, प्रवक्ते समीर चव्हाण, प्रसिद्धीप्रमुख संजय दळवी, कार्यालय-प्रमुख सोपान चौधरी, 'धर्मराज्य रिक्षा-टॅक्सी संघटने'चे रमेश रेड्डी, सुशीलकुमार चंद्रा, रवी मिश्रा आदी पदाधिकाऱ्यांसह, 'धर्मराज्य पक्षा'चे कार्यकर्ते मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# खासदार पुरोहित बूट चाटून साफ करायच्या नादात जरा जास्तच अघळपघळ बोललेत...

## कुणाचा पुनर्जन्म?

छत्रपती शिवाजी महाराजांनी 'प्रपंच करावा नेटका' उक्तीनुसार आपल्या सगळ्या कुटुंबाची आणि स्वराज्याच्या रयतेची काळजी केली आणि कर्तव्य पार पाडली.

मातोश्री जिजाऊ कायमच स्वराज्यात मार्गदर्शक आणि दीपस्तंभ होत्या, त्यांना नोटा बदलायच्या रांगेत उभे करण्याचा प्रमाद करणारे छत्रपती नव्हेत.

लाखभर सैन्याच्या वेढ्यात घुसून थेट शाहिस्तेखानावर सर्जिकल स्ट्राईक करण्याचं धाडस छत्रपतींमध्ये होतं, आपलेच कार्यकर्ते झेंडे दाखवताना फ्लायओव्हरवर गाडीत बसून राहणारे शिवाजीराजे नव्हेत.

सुरत लुटून गडकिल्ल्यांच्या मजबुती आणि स्वराज्याचे संरक्षण आणखी चोख करण्याला संपत्ती वापरणारे छत्रपती होते, आपल्याच राज्याची संपत्ती दोन दोस्तांवर उधळणारे छत्रपती नव्हेत.

सोन्यासारख्या माणसांना गमावणे परवडणार नाही म्हणून, पराभव पत्करून जयसिंहसोबत तह करणारे शिवाजीराजे होते, आपले सैनिक स्फोटात मरत असताना, जिम कॉर्बेट पार्कात शूटिंग करणारे छत्रपती नव्हेत.

मुघल दरबारात थेट बादशहाला करारी जबाब देऊन तिथूनही बुद्धीचातुर्याने सुटका करून घेणारे छत्रपती होते, 'ना कोई घुसा है ना कोई अंदर आया है' म्हणून अपयशावर पांघरुण घालणारे छत्रपती नव्हेत.

आपले कुळाचार पाळत असताना राज्यातील सगळ्या रयतेला आपापला धर्म पाळण्याची मुभा देणारे छत्रपती होते, 'कपड्यावरुन धर्म कळतो' म्हणणारे छत्रपती नव्हेत.

'रयतेच्या भाजीच्या देठाला हात लावू नका' म्हणणारे छत्रपती होते, 'घर मे शादी है और पैसे नही' म्हणून आपल्याच रयतेची खिल्ली उडवणारे छत्रपती नव्हेत.

परस्त्री मातेसमान मानणारे आणि रांझ्याच्या पाटलाचा चौरंग करणारे छत्रपती होते, बलात्काराच्या गुन्हेगारांना शिक्षेत माफी देणारे छत्रपती नव्हते.

पुरोहित, छत्रपती शिवाजी महाराज या नावापेक्षा महाराष्ट्राला आदरणीय दुसरं काही नाहीये, तुम्ही महाराजांचा घोर अपमान केलेला आहे.

याबद्दल माफी नाहीच.

*...आनंद शितोळे*

# रायगड जिल्ह्यात 'धर्मराज्य पक्षा'चा अश्वमेध उधळला...

...पृष्ठ क्र. १ वरुन







**मा. राजन राजे यांच्या अध्यक्षतेखालील 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे सदस्यत्व स्विकारले आहे. यासंदर्भात, कंपनीच्या युनिट–१ आणि युनिट–२ या दोन्ही ठिकाणच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ युनियनच्या नामफलकाचे अनावरण शनिवार, दि. १ मार्च–२०२५ रोजी, मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाले.**

यावेळी डीआरटी अँथिया कंपनीतील सर्व कामगार सदस्यांसोबत, व्यवस्थापनाचे आशिष दगडे आणि व्ही.पी. जोजी हे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर, सचिव समीर चव्हाण, खजिनदार अजित सावंत, 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित, ऐरोली विधानसभा सचिव सिद्धेश सावंत–भोसले आदी मान्यवर पदधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, युनियनच्या नामफलकांचे अनावरण झाल्यानंतर, 'आर.आय.आर.सी' सभागृहात संपन्न झालेल्या कामगार मार्गदर्शन मेळाव्यात, **उपस्थित कामगार सदस्यांना संबोधित करताना मा. राजन राजे म्हणाले की, ''सद्यस्थितीत सर्वात जास्त शोषण कोण करीत असेल आणि कॉर्पोरेट टेररिझम कोण माजवत असेल तर, त्या आहेत बहुराष्ट्रीय कंपन्या. कामगार चळवळीचं सामर्थ्य कधीच लयाला गेलंय, कारण आम्ही आपापसांत हेवेदावे मांडायला लागलो आहोत. संघटना चांगली चालायला लागली की, त्यात मोडता घालायचा, आम्ही आमच्याच हिताबद्दल उदासीन रहायला लागलो. मराठी माणूस हा, ८० ते ९० टक्के कामगार–शेतकरी असतो. मात्र, सरकारच्या 'खाउजा' धोरणामुळेच कामगार आणि शेतकरी एकाचवेळी उध्वस्त झालेत. कामगार निवृत्त झाल्यानंतर अक्षरशः उघड्यावर पडतो. म्हणून मी नेहमी म्हणतो, तुम्ही स्वतःला संघर्षात गुंतवलं नाहीत तर, म्हातारपणी तुम्हाला लाचारीचा सामना करावा लागेल!''** असा इशारा देत, मा. राजन राजे उपस्थित कामगारांना संबोधित करताना पुढे म्हणाले की, तुमच्या रोह्याने १५ वर्षे आणि ठाण्याने २५ वर्षे वाया घालवली. एव्हाना शेकड्याने नव्हे; तर, हजारो कंपन्यांमध्ये आपण पसरायला हवं होतं. आहे का कोणी, या राजन राजेसारखा जातीवंत आणि जाज्वल्य विचारांचा कामगार नेता? असा सवालदेखील त्यांनी यावेळी उपस्थित केला.

''संपूर्ण जगात 'कामगार–पुढारी' ही महत्त्वाची व्यक्ती मानली जाते व तेच प्रामुख्याने राजकारण चालवतात...आणि इथे सच्च्या कामगार पुढार्‍यांना राजकारणात काळ कुत्रंदेखील विचारत नाही...भक्कम आधारसाठी राजकीय आधारवड नसेल; तर, कामगार–चळवळीची लतावेल जमिनीवरच खुरडून, तुडवली जाऊन उध्वस्त होईल. हे समजत नाही म्हणूनच दुर्दैवाने आज मराठी माणसाची अवस्था अतिशय बिकट झालीय...मराठी माणसाइतका मूर्ख माणूस आज जगाच्या पाठीवर शोधूनही सापडणार नाही. एवढे महान संत, शिवछत्रपती–बाबासाहेब आंबेडकरांसारखे महापुरुष आमच्या महाराष्ट्रात होऊन गेले; तरी आमच्या जगण्यात, आमच्या आचारविचारात ते उतरत नाहीत. **फक्त, ''जय शिवाजी, जय भीम'' म्हटलं की, आमची जबाबदारी संपली! शिवछत्रपती म्हणजे, ''केवळ तलवारबाजी नव्हे; तर, उच्चकोटीच्या जीवनमुल्यांसाठी लावलेली प्राणांची बाजी'' होय. पण, आम्ही कसली प्राणांची बाजी लावणार? छत्रपती शिवाजी महाराज यासाठी महत्त्वाचे आहेत की, त्यांनी रयतेच्या आयुष्यात स्थैर्य आणि सन्मान निर्माण केला...भूहिनांना कसायला हक्काचे जमिनीचे पट्टे दिले; म्हणजे, आजच्या परिभाषेत ''कंत्राटी–कामगारांना कायम केलं''** आणि तुमच्याकडचे कारखाने, इथल्या राजकारण्यांच्या आशिर्वादाने कंत्राटी–कामगार नावाच्या गुलामांच्या घामावरच मोठ्याप्रमाणावर चालतात. शिवबा–संतांचं हिंदुत्व जाज्वल्य होतं आणि आताचं सगळंच बोगस–ढोंगी हिंदुत्व! राममंदिर बांधून झालंय, नुकताच दंभमेळा संपन्न झाला, हा कसला कुंभमेळा? ती तर, मतं मिळविण्यासाठी व देशाचा घसरलेला रुपया आणि कोसळलेला शेअरबाजार लपविण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपडच. ठाण्यातील आले; तसेच काही नव्याने प्रदूषणकारी रासायनिक–कारखाने तुमच्या रोह्यामध्ये आलेत आणि त्यामुळे तुमच्यासकट तुमच्या पुढील पिढ्या कर्करोगासारख्या (कॅन्सर) अनेक दुर्धर रोगांनी पिडीत होऊन 'अल्पजिवी' ठरणार आहेत...त्या तिथे फार मोठी गरज असताना उच्चदर्जाच्या सार्वजनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत का? दिल्लीसारख्या उत्तम सार्वजनिक शाळांचा तर पत्ताच नाही! शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव आहे का? तुमच्याकडे आहे तरी काय, तुमच्याकडे कंपनीचं भागभांडवल तरी आहे का? निवृत्तीनंतर तुटपुंज्या ग्रॅच्युइटी आणि प्रॉ. फंडामुळे अक्षरशः उघड्यावर पडाल!'' असा गर्भित इशारा 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित कामगारांना शेवटी दिला.

---

*(दासबोध: दशक ११,*
*समास दुसरा, पृष्ठ ५८२)*
*देव जाले उदंड।*
*देवांचें मांडले भंड ।*
*भूतदेवतांचें थोतांड ।*
*येकचि जालें ।। २० ।।*
*मुख्य देव तो कळेना ।*
*कशास कांहींच मिळेना ।*
*येकास येक वळेना ।*
*अनावर ।। २१ ।।*
*ऐसा नासला विचार ।*
*कोण पाहातों सारासार ।*
*कैंचा लहान कैंचा थोर ।*
*कळेचिना ।। २२ ।।*
*शास्त्रांचा बाजार भरला ।*
*देवांचा गल्बला जाला ।*
*लोक कामनेच्या व्रताला ।*
*झोंबोन पडती ।। २३ ।।*
*ऐसे अवधें नासलें ।*
*सत्यासत्य हारपलें ।*
*अवधें अनावेक जालें ।*
*चहूंकडे ।। २४ ।।*
*मतामतांचा गल्बला ।*
*कोणी पुसेना कोणाला ।*
*जो जे मतीं सांपडला ।*
*तयास तेंचि थोर ।। २५ ।।*
*असत्याचा अभिमान ।*
*तेणें पाविजे पतन ।*
*म्हणोनियां ज्ञाते जन ।*
*सत्य शोधिती ।। २६ ।।*

देवाधर्माच्या नावानं राजकारण करणाऱ्या आणि असत्याचा अभिमान धरणाऱ्या आजच्या हिंदुत्ववाद्यांना वरील श्लोकातील रामदास का पचत नाहीत? पचले असते तर, त्यांनी आज ज्या पद्धतीने राममंदिर, कुंभमेळा या सगळळ्यांचे इव्हेंट्स करून लोकांच्या धार्मिकतेचा गैरफायदा घेत अंधश्रद्धेचा बाजार भरवला आहे, तो भरवण्यापूर्वी दहा वेळा विचार केला असता. पण, आजच्या या तथाकथीत स्वतःला धार्मिक समजणाऱ्या हिंदुत्ववाद्यांना देवाधर्माचा उपयोग हा स्वतःच्या मतलबी राजकारणाच्या फायद्यासाठी करायचा आहे. त्यासाठी लोक प्रश्न न विचारता मेंढरू वृत्तीने जगणारे जेवढे अंधश्रद्ध राहतील, तेवढे त्यांना हवे आहेत. म्हणून त्यांना रामदास काय, सावरकर काय हे सगळे आपल्या सोयीनुसार हवे असतात. रामदासांचे अंधश्रद्धाविरोधी विचार किंवा सावरकरांचे विज्ञाननिष्ट विचार मात्र, ते कचऱ्याच्या टोपलीत फेकून देत असतात.

तेव्हा जनहो आणि जे दासबोध वाचतात त्या सगळ्यांनी, वरील श्लोकांत रामदास सांगतात त्याप्रमाणे धर्माच्या नावाखाली तुमचेच शोषण करणाऱ्या, कर्मकांडांच्या थोतांडापासून दूर राहा आणि धर्माला स्वच्छ करा. रामदास म्हणतात त्याप्रमाणे धर्माची चिकित्सा करणारेच खरे ज्ञाते असतात, तेच धर्मसुधारणा करणारे असतात, त्यांनाच आपण बळ दिले पाहिजे. म्हणून हिंदूधर्माला लागलेली ही राजकीय हिंदुत्वाची कीड नष्ट करा. त्यातच तुमचे–आमचे कल्याण आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची पूर्णपणे गळचेपी होण्याआधीच जागे व्हा. रामदासांच्या श्लोकांचा खरा अर्थ जाणून घ्या.

@JK

# औरंग्याची कबर उखडून टाकाच, पण....

...पृष्ठ क्र. १ वरुन

यात प्रथम आपण घेऊयात मिर्झाराजे जयसिंग यांना. औरंगजेबाचे साम्राज्य वाढावे, औरंगजेबाला त्रास देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना पराजित करावे यासाठी औरंगजेबाने त्याच्या दरबारातील त्याचा अत्यंत प्रामाणिक सरदार मिर्झाराजा जयसिंग याला पाठविले. **जयसिंगाने औरंगजेब जिंकावा आणि छत्रपत्री शिवाजी महाराज पराभूत व्हावेत याकरिता कोटी चंडी यज्ञ केला. त्यासाठी, महाराष्ट्रातील ४०० ब्राम्हणांनी या यज्ञाचे अधिष्ठान केले, मिर्झाराजाला मदत केली. याच जयसिंगामुळे शिवरायांना पुरंदरचा तह करावा लागला, स्वराज्यातील काही किल्ले परत करावे लागले, आग्रा येथे औरंगजेबाच्या दरबारात जावे लागले आणि कैद व्हावे लागले. औरंगजेबाने याच मिर्झाराजा जयसिंग याच्या सन्मानार्थ बुरहानपूरमधील ताप्ती नदीच्या काठावर छत्री (स्मारक) उभारली, ज्याला आता 'राजा की छत्री' म्हटले जाते. ही छत्रीसुद्धा औरंगजेबाच्या कबरीसोबत उखडून टाकली पाहिजे.** मोघलांना मदत केलेल्या सर्वच देशद्रोह्यांची स्मारके, समाध्या, स्मृतिस्थळे उखडून टाकली पाहिजेत. मिर्झाराजाला त्या कोटीचंड यज्ञात मदत केलेल्या ४०० ब्राम्हण पुजाऱ्यांची आणि अफजल्याला मदत करत शिवरायांवर वार करणाऱ्या कृष्णा भास्कर कुलकर्णीची वंशावळ शोधून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली पाहिजे.

**सावरकरांनी त्यांच्या समग्र वाङ्मयाच्या ६व्या खंडात शेंदापूरचा गणपती या प्रकरणात लिहून ठेवलंय की, ''शिवाजीचे चरित्र ऐकून ऐकून तुमचे कण किटले असतील, शिवाजी हा जुना आदर्श झालाय, नवा आदर्श आमचा नरू न्हावी आहे...नरू न्हाव्याचा वस्तरा, शिवाजीच्या तलवारीपेक्षा जास्त चमकतो!'' हा छत्रपती शिवरायांचा किती मोठा अपमान आहे? सहा सोनेरी पाने या पुस्तकात सावरकर लिहितात की, ''शिवाजी हा काकतालीय न्यायाप्रमाणे (योगायोगाने) राजा झाला.'' म्हणजे, कावळा बसायला आणि फांदी तुटायला...या म्हणीप्रमाणे शिवराय राजे झाले. त्यात त्यांचं कर्तृत्त्व-पराक्रम काहीच नव्हता. हेच सावरकर, संभाजी महाराजांना बदफैली, राज्यबुडवा, नादान बिघडलेला राजपुत्र म्हणतात...इतक्या वाईट शब्दांत, दोन्ही छत्रपतींचा अपमान करणाऱ्या सावरकरांचे मुंबईतील शिवाजी पार्कजवळील सावरकर सदन आणि अंदमानातील सेल्युलर जेलमधील सावरकरांना ठेवलं होतं ती खोली, अशी दोन्ही स्मारके आधी उखडून टाकली पाहिजेत.**

त्यानंतर माधव गोळवलकर याने छत्रपती शिवरायांबद्दल आणि देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या राजपूत राजांबद्दल अत्यंत विकृत आणि अपमानास्पद लिखाण केलेले आहे. आपल्या 'विचारधन या पुस्तकाच्या पान क्र. २५९ वर ते लिहितात की, ''राजपुतांचे बलिदान हे त्यांच्या पराक्रमाचे, स्वाभिमानी व निर्भय वृत्तीचे निदर्शक आहे, यात शंका नाही; परंतु, त्याचबरोबर ते विकृत व आत्मघाती आकांक्षेचेही प्रतीक आहे. भारतीय इतिहासाच्या शौर्यगाथेमधील तो एक संस्मरणीय परंतु, दुःखद अध्याय आहे. क्षात्रधर्मासंबंधीच्या चुकीच्या धारणेमुळेच, या वीरपुरुषांनी हौतात्म्याची आकांक्षा बाळगून आत्मनाश करुन घेतला. ही ही एक प्रकारची दुर्बलताच आहे. परिस्थितीचे दडपण अति झाल्यामुळे वैफल्याच्या भाराखाली नष्ट होऊन जाणे, हा आपला आदर्श होऊ शकत नाही.'' म्हणजे राजपूत राजांचे बलिदान, हे विकृत व आत्मघाती आकांक्षेचे प्रतीक आहे आणि ते आपले आदर्श होऊ शकत नाही, असे म्हणणारे गोलवळकरच अशा हिंदुत्ववाद्यांचे आदर्श आहेत, किती हा विरोधाभास?

**छत्रपती संभाजी राजेंना हे गोळवलकर स्त्रीलंपट आणि दारुड्या म्हणतात. पुढे याच विचारधन पुस्तकाच्या पान क्र २६९ वर गोळवलकर छत्रपती संभाजी राजांबद्दल लिहितात की, ''संभाजीला पकडून हालहाल करून त्याचा वध करण्यात आला' असे लिहिले आहे. वध कुणाचा करतात ? मरणारा राक्षस किंवा दुष्ट असेल**

हे सावरकर, गोळवलकर, गडकरी, छिंदम आणि कोरटकर या सर्व एकाच विशिष्ट ज्ञातीबंधवांनी जितके अपमानास्पद शब्द छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आणि छ. संभाजी महाराजांबद्दल वापरले... इतके वाईट शब्द तर कधी औरंगजेबानेही शिवरायांबद्दल वापरल्याचा इतिहासात उल्लेख नाही. उलट शिवरायांच्या निधनाची बातमी ऐकून औरंगजेब दुःखी होऊन अल्लाहकडे दुवा करतो की 'ऐ अल्लाह, तेरे जन्नत के दरवाजे खुले रखना. एक नेक बंदा आ रहा है''. बरं छत्रपती शिवाजी-संभाजी महाराजांबद्दल वाईट बोलणारे हे सारे एकच ज्ञातीबांधव असतात. कधीच कुणी मुस्लिम दोन्ही छत्रपतींविषयी वाईट बोलत नाही. या ज्ञातीबांधवांकडून कधीच पेशवे, सावरकर, हेडगेवार, रामदास, गोळवलकर यांच्याबद्दल चुकूनही अपशब्द निघत नाही, हा योगायोग असावा काय?

**आणि मारणारा नायक किंवा पूजनीय असेल तर, त्याचा वध म्हणतात. यामध्ये मारणारा नायक असतो. हत्या किंवा खून शब्द वापरताना त्यात मारणारा वाईट आणि मरणारा चांगला असा दृष्टिकोन असतो. संघ, हिंदू महासभा, भाजपचे लोक महात्मा गांधींच्या हत्येबद्दल 'गांधीवध' हा शब्द वापरतात; कारण, नथुराम त्यांना अतिप्रिय आहे. परंतु छ. संभाजी राजेंच्या हत्येबद्दल देखील 'वध' हाच शब्द वापरुन गोळवलकरांनी त्यांच्या मनातील छत्रपती संभाजी राजेंबद्दल असलेली भावना स्पष्ट केली आहे.** गोलवळकरांसाठी औरंगजेब हा नायक किंवा आराध्य असल्याशिवाय ते असा शब्द वापरणार नाहीत. मग औरंजेबाला नायक मानून त्याचे उदात्तीकरण करणाऱ्या या माधव गोलवळकरची नागपुरातील रेशीमबागेतील समाधीसुद्धा उखडून टाकली पाहिजे.

राम म्हणावं की हराम कळत नाही; पण, **ह्या विकृत गडकरीने आपल्या राजसंन्यास नाटकात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल लिहिलंय की, ''अरे शिवाजी म्हणजे मूठ दाबल्या साडे तीन फुट उंचीचा, त्याची काय मात्तबरी सांगतोस देहू, म्हणे हिंदूपदपातशाही उठवली! काय रे मोगलाई मोडली आणि मराठशाही झाली म्हणून इकडची दुनिया तिकडे झाली वाटते? शिवाजीच्या राज्यात लिंबोणीला आंबे आले की, बकरीने आपली पोर वाघ्याच्या पोराला दिली? की कणसामधून माणसे उपजली? अरे केले काय शिवाजीने असे? मोघलाईत हुकमती केसाची टोळी दाढीखाली लोंबत होती ती मराठशाहीत कवठी वर चढली, तेवढाच लाभ! शिवाजी नशीबाचा म्हणून, त्याचे नाव झाले इतकेच! त्यातून खरं सांगू? शिवाजीची लायकी चारचौघांना पुढे कळणार आहे''. इतकं विकृत लिखाण आणि तेसुध्दा छत्रपती शिवरायांबद्दल? या राम गणेश गडकरीच्या नावाने असलेल्या सर्व इमारतींची नावे बदलून टाकावीत आणि नागपूरच्या सावनेरमध्ये या गडकरीची असलेली कबरसुद्धा ताबडतोब उखडून टाकायला हवी. हो कबरच... कारण, असे बोलणारे-लिहिणारे औरंगजेबाचेच वैचारिक वारसदार असू शकतात.**

**मागे छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या समर्थ साहित्य संमेलनाचे उदघाटक राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी समर्थांशिवाय शिवाजीला कोण विचारेल? असे शिवरायांबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठाचे दीक्षांत समारोहातदेखील ''शिवाजी हा जुना आदर्श झाला, नवीन आदर्श नितीन गडकरी आहेत''. असे शिवरायांबद्दल विकृत वक्तव्य केले; पण, मग या काळ्या टोपीखालील मेंदू गहाण असणाऱ्या कोश्यारीवर काय कारवाई झाली? त्याअगोदर नगरचा उपमहापौर श्रीपाद छिंदम शिवरायांबद्दल अत्यंत खालच्या स्तरावर जाऊन बोलला. राहुल सोलापूरकर बोलला आणि प्रशांत कोरटकरने तर शिवरायांचा एकेरी उल्लेख करत छत्रपतींबद्दल अत्यंत अपमानास्पद शब्द वापरले. त्याच्यावर कठोर कारवाई सोडा साधी अटकही झालेली नाही. ह्या शिवद्रोही छिंदम-कोरटकर यांचे घरं कधी उखडून टाकणार आहात? हे स्वतःला कट्टर हिंदुत्ववादी म्हणवणारे कधी वरील सर्वांचे पुतळे जाळून त्यांच्या घरावर बुलडोझर चालविण्याची मागणी करणार आहात?**

हे सावरकर, गोळवलकर, गडकरी, छिंदम आणि कोरटकर या सर्व एकाच विशिष्ट ज्ञातीबंधवांनी जितके अपमानास्पद शब्द छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आणि छ. संभाजी महाराजांबद्दल वापरले... इतके वाईट शब्द तर कधी औरंगजेबानेही शिवरायांबद्दल वापरल्याचा इतिहासात उल्लेख नाही. उलट शिवरायांच्या निधनाची बातमी ऐकून औरंगजेब दुःखी होऊन अल्लाहकडे दुवा करतो की 'ऐ अल्लाह, तेरे जन्नत के दरवाजे खुले रखना. एक नेक बंदा आ रहा है''. बरं छत्रपती शिवाजी-संभाजी महाराजांबद्दल वाईट बोलणारे हे सारे एकच ज्ञातीबांधव असतात. कधीच कुणी मुस्लिम दोन्ही छत्रपतींविषयी वाईट बोलत नाही. या ज्ञातीबांधवांकडून कधीच पेशवे, सावरकर, हेडगेवार, रामदास, गोळवलकर यांच्याबद्दल चुकूनही अपशब्द निघत नाही, हा योगायोग असावा काय?

**औरंगजेबाची कबर महाराष्ट्रातून उखडून टाकली पाहिजे असे ज्यांना वाटते, त्यांना** ...पृष्ठ क्र. ६ वर

# औरंग्याची कबर उखडून टाकाच, पण....

...पृष्ठ क्र. ५ वरुन

**माझा एक प्रश्न आहे की, औरंगजेबाची कबर म्हणजे काय आहे? त्याच्या महानतेचे किंवा त्याच्या सत्तेचे उदात्तीकरण करणारी इमारत आहे? त्याच्या जीवनकार्याचा गौरव करणारे स्मारक आहे? नाही. ते आहे औरंगजेबाचं थडगं, फक्त थडगं. ते थडगं छत्रपती शिवरायांच्या आणि मराठा साम्राज्याच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष आहे. औरंग्या शेवटी इथेच मेला; पण, मराठ्यांना पराभूत करु शकला नाही याचा ठोस पुरावा आहे. आज औरंगजेब असल्याचा पुरावा संपवला की, उद्या छत्रपती शिवाजी महाराजांचा संघर्षच इतिहासातून वगळून टाकतील. कारण, त्यांना वि.दा. सावरकरांच्या म्हणण्याप्रमाणे ''शिवाजी हा काकतालीय न्यायाप्रमाणे (योगायोगाने) राजा झाला.'' (त्यात त्यांचा पराक्रम कर्तृत्त्व काहीच नव्हतं) हेच सिद्ध करायचं आहे. औरंगजेबाची कबर गायब केली की, २५ वर्षानंतरच्या पिढीला 'औरंगजेब नावाचा कोण मोघल बादशाह होता? छ. शिवाजी महाराज लढले कुणाशी? स्वराज्य कुणाची गुलामगिरी झुगारून उभं केलं? हे सांगण्याची गरजच पडणार नाही. हा छत्रपती शिवरायांचा सगळा इतिहासच यांना पुसून टाकायचा आहे.**



या लेखात मी फक्त औरंगजेब म्हणजेच, मोगल हाच विषय घेऊन लिहिलंय. ब्रिटिश आणि स्वातंत्र्यालढ्याबद्दल लिहिलेलं नाही. ते लिहिलं तर अस्सल देशद्रोह्यांची यादी भलीमोठी होईल.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता आली. निवडणुकांपूर्वी भाजपाईंनी जी जी आश्वासने दिली, ती सगळी खोटी ठरली. देश आणि राज्य अगदी गळ्यापर्यंत कर्जात बुडाले आहे. बीडचे देशमुख हत्या प्रकरण, परभणीचे हत्या प्रकरण, बदलापूर, पुणे, नागपूर, मुंबई, बीड असा संपूर्ण महाराष्ट्रातच अत्यंत गंभीर गुन्ह्यांचा चढता आलेख. **मुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून सपशेल फेल झालेले देवेंद्र फडणवीस. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या वीजबिल माफीवीर शासनाचे घूमजाव, शेतकरी आत्महत्या, फोडाफाडीचे व अत्यंत खालच्या स्तरावरील राजकारण, सरकारी यंत्रणांचा खुला गैरवापर, अदानीच्या घशात घातलेली धारावी...हे सर्व घोटाळे आणि अपयश झाकण्यासाठी भाजपने औरंग्याचा आधार घेतलाय. नाहीतर राज्यात आणि केंद्रात दोन्हीकडे भाजपची सत्ता असतांना, हे कबर उखडून टाकतो हे बोलत बसले नसते. कबर आतापर्यंत उखडून टाकली असती.** राज्यात, केंद्रात सत्ता असताना हे सत्ताधारी कुणाला कबर उखडून टाकण्याची मागणी करत आहेत? पण ह्या औरंगजेबी भाजपायी प्रवृत्तीला फक्त आणि फक्त घडवायच्यात दंगली. कारण, दंगल, हे एकच अस्त्र असं आहे, जे यांचे पाप झाकू शकते आणि यांची सत्ता वाचवू शकते. त्यामुळे दंगल घडवायची की, ही दंगलखोर मंडळी सत्तेवरुन घालवायची...हे आपलं आपण ठरवायचं आहे.

**– चंद्रकांत झटाले**, अकोला

# नीतिमान शिवराय ते अनितीमान औरंगजेब



**काही बेअक्कल, लाळघोट्या, नाठाळ अशा भाजपाई लोकांकरवी शिवछत्रपतींची तुलना पं. नरेंद्र मोदींशी केली जाणं, हा शिवछत्रपतींचा घोर अपमान आहे... औरंगजेबाकडून, त्याच्या भर दरबारात केला गेलेला शिवछत्रपतींचा अवमान, त्यापुढे फिका ठरावा!**

आता, शिवाजी आणि औरंगजेब, यांचे आपण अगदी थोडक्यात स्वभावदर्शन मांडूया....

- आमचा शिवाजी सर्वधर्मसमभाव मानणारा, अत्यंत न्यायी व सहिष्णू होता... तर, मोंगलांचा औरंगजेब धर्मद्वेष्टा, अन्यायी व कमालीचा असहिष्णू होता!
- वर्ष-२००२च्या गुजराथ-दंगलीसारखं शिवछत्रपतींनी चुकूनही कधि, कुणी मुसलमान वा अन्यधर्मीय आहे म्हणून, आपल्या राज्यात त्यांचं शिरकाण वा हत्याकांड घडवलं नव्हतं; त्यांनी सर्वधर्मियांना समान न्यायाने व सन्मानानेच वागवलं होतं...

औरंगजेबाने हिंदुंना 'जिझिया-कर' वगैरे लादून छळलं आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, आमच्या महाराष्ट्राच्या छाव्याची, शंभूराजांची माणुसकीला लाजवणारी क्रूर हत्या केली!

- आमचा शिवाजी शूर होता, नीतिमान होता...तर, मोंगलांचा औरंगजेब क्रूर होता, अनितीमान होता!
- शिवछत्रपतींनी रयतेची म्हणजेच, तळागाळातील लोकांची विशेष काळजी वाहिली...उदा. त्यांनी भूमिहीन कुळांना कसायला मालकी-हक्काने जमिनीचे पट्टे दिले; म्हणजे, आजच्या 'भांडवली-परिभाषे'त त्यांनी ''गुलामीत खितपत पडलेल्या 'कंत्राटी-कामगारां'ना नोकरीत 'कायम' केलं!''

आजचे भाजपाई-संघीय राज्यकर्ते, तळागाळातील शेतकऱ्यांची व कामगारांची लूट करण्यासाठी, त्यांना उध्वस्त करण्यासाठी काळे-कायदेकानून आणू पहातात; तर शिवछत्रपती फर्मान काढून व चोख राज्यकारभार करुन समाजातल्या शेवटच्या घटकाला म्हणजेच, श्रमिकवर्गाला बळकटी व सन्मान-सुरक्षा देण्यात गुंतले होते.

...याउलट, औरंगजेब आपली सत्ता कायम राखण्यासाठी आपल्या हुजऱ्यांवर, दरबाऱ्यांवर व सरदार-बरकदारांवर विशेष मेहरबान होता; जसे, आजचे राज्यकर्ते आपल्या बड्या दोस्त-भांडवलदारांवर (Crony-Capitalists) कायदे धाब्यावर बसवून मेहेरनजर राखून आहेत.

तात्पर्य क्र. १ : वरील त्रोटक, पण महत्त्वपूर्ण विवेचनांति...तथाकथित हिंदुत्ववादी बड्या भाजप नेत्यांची तुलना कोणाशी करायची; ''शिवछत्रपतींशी की, औरंगजेबाशी'' ...ते आपण सुजाण वाचकांवरच सोडून देऊया!

...अन्यथा, त्याचं अचूक उत्तर द्यायला "AI GROKE" आहेच की मदतीला. नाहीतरी, नुकतंच AI GROKE तांत्रिक-सुविधेने, रा. स्व. संघाच्या स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाविषयी अचूक उत्तर दिलेलं आहेच...तेव्हा, त्या कृत्रिम-बुद्धिमत्तेचा आधार घ्यायला, काय हरकत कुणाची?

**तात्पर्य क्र. २ :** आपल्यावर चालून आलेल्या व दगाबाजीने आपल्याला ठार करु पहाणाऱ्या... अफझलखानाचा वध केल्यानंतर, त्याची सन्मानपूर्वक कबर बांधण्याचा हुकूम सोडणारे, आभाळाएवढ्या मोठ्या मनाचे आमचे शिवछत्रपती आज हयात असते; तर, औरंगजेब महाराष्ट्राचा 'अनंत अपराधी' असूनही, त्या औरंग्याची कबर उध्वस्त करायचा विचार, त्यांच्या मनाला शिवला असता?

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# २८ वर्षांची लढाई सुफळ संपूर्ण जाहली...

## लढल्याने होत आहे रे, आधि लढलेचि पाहिजे....

**५८० 'कंत्राटी' सफाई कामगार, जे १९९६/९७ मध्ये BMC मध्ये कामाला लागले होते, देशाच्या स्वातंत्र्याला ५० वर्षे होत असताना कामावर लागले होते, ज्यांना कोणतेही कामगार कायदे लागू होऊ नयेत; म्हणून, स्वयंसेवक (व्हॉलेंटियर) म्हटले गेले, ज्यांच्या पगाराला 'मानधन' म्हटले गेले, ज्यांना ३६५ दिवस काम करताना एकही पगारी रजा दिली गेली नव्हती, ज्यांना हजेरी कार्ड नव्हते, ज्यांच्यासाठी कामगार कायदे पायदळी तुडवले गेले होते, ज्यांच्या कॉंट्रॅक्टरला N.G.O. असे दाखवले गेले होते....ते सर्वजण, सहनशक्तिचा अंत पहाणाऱ्या अशा एका प्रदीर्घ लढ्यानंतर अखेर जिंकलेच... ''अदालत में देर होती है, मगर अंधेर नहीं होती'', याचा कष्टप्रद पण, अत्यंत सुखद अनुभव मुंबई महापालिकेच्या सफाई कामगार-कर्मचारीवर्गाने अशातऱ्हेनं घेतला!**

मुळातूनच, या दिशाहीन कामगारांना संघटित करणे, युनियनच्या एका छत्राखाली आणणे... हेच एकंदरीत महाकर्मकठीण होते. कोणत्याही अधिकाऱ्याची, नगरसेवकाची साथ मिळण्याची शक्यताच नव्हती...असं या सफाई कामगारांचं अवघं कामगारविश्व अंधःकारमय असताना... कम्युनिस्ट विचारधारेच्या डाव्या मंडळींनी कंबर कसून मेहनत घेतली व सातत्याने कामगारांसोबत राहून, त्यांच्यात वावरुन त्यांचा विश्वास संपादन केला व त्यांना लढण्यास प्रेरित केलं.

१९९९ ते २०२५ या काळात रस्त्यावर आणि कोर्टात लढाई झाली. किमान-वेतनदेखील नाही; म्हणून ''कामगार-आयुक्तांच्या घरी जेवायला चला'' असा मोर्चा काढावा लागला. काम करताना एका कामगाराला गाडीने उडवले व त्यात कामगाराचा मृत्यू झाला, कंत्राटदार (कॉंट्रॅक्टर) जबाबदारी घ्यायला नकार देत होता, महानगरपालिकाही जबाबदारी घेण्यास तयार नव्हती...म्हणून नाईलाजाने, मयत कामगाराचे प्रेत कामगार-आयुक्तांच्या दालनासमोर ठेवावे लागले. गणवेश (युनिफॉर्म) नाही; म्हणून कामगारांनी चड्डी-बनियन मोर्चा काढला, पावसाळी बूट देत नाहीत; म्हणून कचऱ्यातून बूट चप्पल जमा करून ''जूते दे दो या हम से ले लो'' मोर्चा काढावा लागला. १९९९ पासून कोर्टात लढे जिंकत जिंकत ३/३/२०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने कामगारांच्या बाजूने नुकताच निकाल दिला... ५८० कामगारांना १९९८ पासून कायम कामगार म्हणून जाहीर केले व वर्ष-२००६ पासून थकबाकी देण्याचा आदेश दिला. या काळात ज्या ७६ कामगारांचा मृत्यू झाला, आणि जे ६५ कामगार निवत्त झाले त्यांना पूर्ण भरपाई आणि त्यांच्या वारसांना नोकरी देण्याचे आदेश दिले. अविरत प्रयत्नांना अखेर यश आलेच!

**गेल्या २८ वर्षांच्या संघर्षामुळे कचरा-वाहतूक श्रमिक संघाने २००३ साली १२४०, २०१७ साली २७०० आणि आता २०२५ मध्ये ५८० कंत्राटी सफाई कामगार मुंबई महानगरपालिकेत कायम केले.**

एकेकाळी फक्त ३० रुपये रोज मिळणाऱ्या या भांडवली-व्यवस्थेच्या परीघाबाहेर फेकल्या गेलेल्या कंत्राटी-कामगारांनी कमालीच्या चिकाटीने कष्टपूर्वक सेवा देत लढा दिला व आता, या ५८० कामगारांना सरासरी दरडोई ७५००० रुपये महिना पगार मिळेल; तसेच, २००६ पासूनची किमान-वेतन आणि प्रत्यक्ष पालिका-वेतन यातील फरकाची मोठी थकबाकीही मिळेल.

ज्यांनी ज्यांनी या लढ्यात मदत केली आहे. त्या सर्वांचे 'कचरा वाहतूक श्रमिक संघा'तर्फे कृतज्ञतापूर्वक स्मरण आणि मनस्वी अभिवादन!

***लडेंगे, तभी जितेंगे, जय भीम, लाल सलाम***

*कॉ. दीपक भालेराव* (अध्यक्ष)
*कॉ . मिलिंद रानडे* (सरचिटणीस)
कचरा वाहतूक श्रमिक संघ





**रामाच्या वनवासाच्या दुप्पट काळ, अत्यंत चिकाटीने प्रखर न्यायालयीन लढा देत, सेवेत 'कायम' झालेल्या...मुंबई महापालिकेच्या लढाऊ सफाई कंत्राटी-कामगारांचं ''धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा''च्या वतीने मनापासून अभिनंदन व कौतुक!**

**न्यायालयीन लढ्याच्या नावाने बोटं मोडणाऱ्या व संप-लढ्यासारखे रस्त्यावरचे संघर्ष करण्याला कचरणाऱ्या... महाराष्ट्रातील लाखो-करोडो 'कंत्राटी-कामगार' नावाच्या 'गुलामां'च्या, मिटल्या डोळ्यांच्या पापण्या उचकटून झणझणीत अंजन घालणारा, हा क्रांतिकारी निकाल व लढा होय!**

**...राजन राजे (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)**

*माहीत होतं सगळ्यांना, तरीही*
*लाज होती लपलेली*
*अशी लागली आग जिने*
*उघडीच पाडली झाकलेली ॥*
*करोडोंच्या नोटा*
*सर्वत्र पडलेल्या,*
*अन्यायाच्या राशी*
*उघड्या वाघड्या ठाकलेल्या ॥*
*आगीच्या त्या उजेडात*
*सगळंच लक्खं दिसलं*
*हरामखोरीच्या धंद्यांचं*
*पितळंच उघडं पडलं ॥*
*पाहून सत्यं असलं*
*न्यायाचा गॉगल खाली पडला*
*डोईचं सावरता सावरता*
*कमरेचाच नेसु सुटला ॥*

*....सतीश अधिकारी*

वर्ष-२०१४ला ''ना खाऊंगा, ना खाने दूंगा,'' असा तद्दन ढोंगी व भंकस नारा देणारे मोदी सत्तेत आले...तेव्हा, हा यशवंत वर्मा नावाचा काळा कोट घालून मिरवणारा 'भ्रष्टाचाराचा महामेरू माय लॉर्ड' दिल्लीच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश बनतो काय आणि आपल्या बंगल्याच्या खोलीत नोटांचा अल्पावधीत ढीग रचतो काय! भ्रष्टाचारावरचा तथाकथित 'सर्जिकल स्ट्राईक' वर्णिलेला कुठे गेला तो 'नोटबंदी'चा करिश्मा? भाजप-संघवाल्यांचे सगळेच 'सर्जिकल-स्ट्राईक'

बनावट...मग तो 'बालाकोट'चा असो,

### नाहीतर 'नोटबंदी'चा!!

ऐन लोकसभा-निवडणुकीच्या तोंडावर कॉंग्रेसचं अकाऊंट बंद करणारा, हाच तो महाभाग (कल्पना करा की, पडद्याआड नेमकं काय घडलं असेल)...धन्य ती, 'भ्रष्टाचारी जोडो पार्टी' बीजेपी आणि धन्य तो, देशात 'संस्कृती'ऐवजी 'विकृती' फैलावणारा संघ...!!! ***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



न्यायमूर्तींच्या बंगल्याला आग लागली आणि बिंग फुटले; अग्निशमन दलाला घबाड सापडले

# कंत्राटी गुलामगिरीचा पगारवाढीच्या मलमपट्टीने फसवणूक!

नवी मुंबई महानगरपालिका आणि नवी मुंबई परिवहन सेवेमधील कंत्राटी, ठोक, रोजंदारी आणि करार तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना गणेशजी नाईकसाहेबांच्या श्रमिक सेनेमुळे वेतन वाढीच्या शासकिय अधिसूचनेचा मसुदा क्रमांक किवेअ-१२२४/प्र. क्र. १६७/काम-७ दि. ६ मार्च २०२५ रोजी जाहीर झाल्याबद्दल दिघा-ऐरोली परिसरातील सामाजिक-राजकीय कार्यकर्ते रत्नदीप कांबळे यांनी मला काल रात्रीच पगारवाढीबाबत तपशीलवार संदेश पाठवला...त्यात, तथाकथित कामगार हिताय असा निर्णय घेणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कामगार मंत्री आकाशजी फुंडकर आणि कंत्राटी कामगारांच्या वेतन वाढीविषयक शासकीस्तरावर पाठपुरावा करणारे राज्याचे वनमंत्री गणेशजी नाईक यांचे कंत्राटी कामगारांच्या आभार मानल्याचा प्रामुख्याने उल्लेख होता.




साधारणपणे कथित नवीन वेतन-संरचनेनुसार कुशल कामगारांचे वेतन प्रति महिना रुपये ३०,५२० (अ आणि ब वर्ग स्थानिक स्वराज्य संस्था), रुपये २६,१६० (क आणि ड वर्ग स्थानिक स्वराज्य संस्था) आणि रुपये २३,९८० ( अ आणि ब वर्ग स्थानिक स्वराज्य संस्था वगळून अन्य स्थानिक स्वराज्य संस्था) तसेच, अर्ध-कुशल कामगारांचे वेतन अनुक्रमे रुपये २८,३४०, रुपये २३,९८० आणि रुपये २१,८०० तर अकुशल कामगारांचे वेतन रुपये २५,०७०, रुपये २१,८०० आणि रुपये १८,५३० निश्चित करण्यात आल्याचं म्हटलंय आणि त्या 'कंत्राटी वेतन-संरचने'त अजून बरीच क्लिष्टता ठासून भरलेली आहे.

***त्यावर माझी संतप्त प्रतिक्रिया मी लागलीच नोंदवताच... त्याचाच एक प्रभावी संदेश बनवून जो नवा संदेश रत्नदीप कांबळेने तत्परतेनं सर्वत्र पाठवला... तोच खालीलप्रमाणे वाचकांसाठी पाठवीत आहे, त्याचा मायमराठी-कामगारहितार्थ महाराष्ट्रभरात स्विकार व प्रसार व्हावा, ही वाचकांना नम्र विनंती!***

***...राजन राजे***

लढाऊ कामगार नेते राजन राजे नेहमी आपल्या भाषणात बोलतात ते अगदी खरं आहे की, एकवेळ सर्कशीतल्या पिंजऱ्यातला बंदिस्त वाघ डरकाळी फोडू शकतो, पण कामगार असा काही उठाव करत नाही!

नवी मुंबई महानगरपालिका कंत्राटी कामगार-कर्मचारी यांच्या वेतनवाढीच्या (मी त्यांना पाठवलेल्या) संदेशाबाबत सदर संदेश प्राप्त होताच ज्वलंत व प्रखर कामगार नेते राजन राजे यांनी पाचच मिनिटात दिलेली लेखी प्रतिक्रिया खालीलप्रमाणे ..........

---

ही सगळी ''कंत्राटी-गुलामांना गुलामगिरीतच 'खितपत' ठेवण्यासाठी आणि कायम-कामगारांना मिळणारी सुरक्षितता-सन्मान नाकारुन या कंत्राटी-नवअस्पृश्यांना सुखसंपन्न समाजाच्या परिघाबाहेरच वर्षानुवर्ष 'तिष्ठत' ठेवण्यासाठी चाललेली गंडवागंडवी आणि पगारवाढीच्या आकड्यांची फसवेगिरी आहे...

एवढ्या वर्षांची (वर्ष-२०१४ किंवा त्याआगोदरपासूनच, म्हणजे प्रत्येकजण जेव्हा प्रथम कामावर लागला असेल तेव्हापासून) पगाराची लाखो रुपयांची 'थकबाकी' द्यायला लावा. लक्षात घ्या की, झालेली वाढ शहरी महागाई पहाता अतिशय तुटपुंजी आहे; पण, मूर्ख, अज्ञानी व डरपोक कामगारांना कोण कसं शिकवू शकणार?

...आणि, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे कामावरुन कधिही व कुठल्याही क्षुल्लक कारणाने काढले जाईपर्यंत, ते 'कंत्राटी-गुलाम'च म्हणून कुढत कुढत जगणार!

त्या संबंधित मंत्र्यासंत्र्यांना म्हणावं की, पगारवाढीचं नंतर बघू...प्रथम नोकरीत 'कायम' करा; पण, दुर्दैवाने ही मूलभूत ठाम भूमिका घ्यायला कामगार-कर्मचारीवर्गाला का कचरतो, त्यांना कसली दाढ भरते, ते कळणं मुश्किलच!

अशाच हवालदिल-हतबल होऊन नियतीच्या हाती आयुष्याचे सगळे दोर सोपवणार्या कामगारांना उद्देशून कार्ल मार्क्स म्हणाला होता की, ''तुमच्या हातापायातील गुलामगिरीच्या शृंखलांखेरीज गमावण्यासारखं तुमच्या हाती काय आहे?''

...आणि, अशाच दिशाहिन व रक्तात गुलामगिरी भिनलेल्या समाजाला उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा!''

थोडक्यात सांगायचं तर, वरील त्रोटक पगारवाढ म्हणजे, ''तुमच्या शरीराला मधुमेह (डायबिटीस) झालेला असताना; त्या मधुमेहावर मुळातून इलाज बिलकूल न करताच, त्यातून होणाऱ्या जखमांवर वरकरणी आयुष्यभर मलमपट्टी करत



रहायचं...त्यामुळे, मूळ रोग तसाच फसफसत राहून वेगवेगळ्या ठिकाणी शरीरावर नव्याने जखमा होत रहाणार आणि त्यावर वरपांगी 'मलमपट्टी' करत तुम्ही झिजत-कुजत, वेदना सहन करत हळूहळू मरायचं!''

**...राजन राजे**

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

---

भांडवली-व्यवस्थेत बव्हंशी उच्च-अत्युच्चशिक्षित, हे त्या व्यवस्थेचे पाईक वा व्यवस्थेच्या पालखीचे भोई असल्याने ''आपण व आपलं व्यावसायिक-केंद्र'' (जे बर्याचदा एखादी कॉर्पोरेट-कंपनी असते) यांची सुरक्षितता व स्वार्थ...यापलीकडे, त्यांची बुद्धी चालूच शकत नाही व त्यामुळेच, भांडवली-व्यवस्थेतल्या 'मोक्याच्या जागी' ते बसलेले असूनही तळागाळातील माणसांसाठी खात्रीपूर्वक आधारभूत ठरु शकत नाहीत. भांडवली-व्यवस्था, ही अशी प्रत्येकासाठी अदृश्य स्वरुपातलं लक्ष्मणरेषेचं वर्तुळ स्वयंभूपणे घालून देत असते...प्रत्येक वर्तुळाची मक्त, त्रिज्या बदलते...गुणधर्म मात्र, तोच रहातो! मग, माणसं आपापल्या कोंदणात जगत रहातात...व्यवस्थेकरवी जगण्याच्या कोंडवाड्यात श्वास कोंडल्या गेलेल्यांची मिकीर, तर केव्हाचीच संपून गेलेली असते! **..राजन राजे**

यंत्राच्या सुट्या भागांप्रमाणे एकमेकापासून विलग झालेले दुबळे मानवी जीव, अगदी आधारहीन अवस्थेत जगतात. आधार शोधायचा तरी कुठे आणि घ्यायचा तरी कुणाचा? भांडवली-व्यवस्थेतले सगळेच आधार ठिसूळ व सापेक्ष असतात...निरपेक्ष, निर्विवाद स्वरुपाच्या भक्कम संरक्षण व आधार देणाऱ्या संस्था, भांडवली-व्यवस्थेनं आतून कौशल्याने आरपार पोखरुन ठेवलेल्या असतात. सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी आधार कसे असावेत... तर, ते सुर्यासारखे न चुकता उगवणारे, मातीसारखे न चुकता जगवणारे आणि पाण्यासारखे न चुकता तहान भागवणारे...भांडवली-व्यवस्थेतले उच्चपदस्थ अधिकारी-प्रशासकीयवर्ग वगैरे पूर्ण करतात या अपेक्षा? या अभिजनवर्गातला जो तो, स्वार्थरक्षणात व सत्ताप्रेमात गुंतलेला व त्या परिप्रेक्षातूनच तळागाळातल्या माणसांच्या समस्यांकडे पहाणारा! **..राजन राजे**

# मराठी पाऊल अडते कसे, मराठी पाऊल अडते कुठे....

कालपरवापर्यंत शेतकरी-आंदोलन असो वा असो लष्करातील 'अग्निवीर-योजना' (जी उद्योग-सेवा क्षेत्रातील 'कंत्राटी-कामगारपद्धती'तल्या 'गुलामी'चा एक लष्करी-अवतारच होय)...समस्त उत्तर भारत, त्याविरोधात आंदोलनात अग्रेसर होता!

आज प्रश्न, 'त्रिभाषा-सूत्रा'अंतर्गत हिंदी भाषा देशात जबरदस्तीने लागू करण्याचा अथवा 'पुनर्सीमांकन' वा 'परिसीमन' योजनेतहत (ऊत्तरेकडील) उत्तर भारताच्या लोकसभा-विधानसभा जागा, दक्षिणेतल्या राज्यांच्या तुलनेनं वाढण्याचा असो...तामीळनाडूसह सगळा दक्षिण भारत त्याविरुद्ध आवाज उठवतोय!!

...पण, अशा सर्वच वेळेस उभा 'महाराष्ट्र', एकतर पाठकणा जमिनीवर टाकून गाढ झोपलेला असतो अथवा तो शहरी-गल्लीबोळात वा ग्रामीण-शेताडात क्रिकेट खेळत असतो किंवा गणेशोत्सव, नवरात्रोत्सव/चैत्रोत्सव, दहीहंड्या, गरबे, भंडारे वगैरे कुठल्यातरी सार्वजनिक-मंडळांच्या उत्सवात दंग असतो वा कुठल्याशा धर्मसंप्रदायातल्या 'षंढ' गर्दीतला एक भाग बनलेला असतो... अन्यथा, कुणी कशानिमित्ताने दिलेल्या ओल्यापार्टीत वा कुणाच्या हळदीत दारु पिऊन धिंगाणा घालत असतो...किंवा, त्या धबडग्यातून उरलासुरलेला वेळ गुंड, बदमाष राजकारण्यांकडे आभाळभूत नजर लावून भिकेची झोळी पसरण्यात घालवतो...!!!

...आणि इकडे, **महाराष्ट्राच्या ग्लानीचा, गाढ झोपेचा गैरफायदा घेऊन अख्खा भारत (विशेषतः उत्तर भारत) आपल्या लालकाळ्या मातीत ओतला जात राहिल्याने व गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाने त्याची 'तिजोरी' पुरती लुटल्याने... प्रश्न, रोजच्या जगण्याचा महाराष्ट्राला जेव्हा भेडसवायला लागतो; तेव्हा महाराष्ट्र, घरातले उरलेसुरले दागिने विकून कशीबशी गुजराण करायला लागतो; कारण, जमिनीचा सातबारा त्याने केव्हाचाच फुंकून टाकल्यापश्चात कुठलीच धड 'पत' शिल्लक राहिली नसल्याने बँकेतून कर्ज मिळण्याचे दरवाजेही बंद झालेले असतात...**

...तरीही चारही बाजुंनी पिचक्या आवाजात उसन्या धैर्याने गर्जना मात्र ऐकू येत रहातात "जय शिवाजी, जय भीम...महाराष्ट्र माझा, मी महाराष्ट्राचा"!

...धन्य धन्य तो 'महाराष्ट्र' आणि धन्य धन्य ते त्याचे मायमराठी प्रजाजन...!!!

***...राजन राजे***, (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष / धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)




महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त, नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील 'विघ्नहर्ता युवा प्रतिष्ठान' या संस्थेच्या वतीने, शिवजन्मोत्सव सोहळयाचे मोठ्या दिमाखात आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष श्री. दिनेश वाशिवले यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमास, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यावेळी मा. राजन राजे यांचा शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे ऐरोली विधानसभा सचिव श्री. सिद्धेश सावंत-भोसले आणि पक्षाचे माहिती अधिकार ठाणे कक्षप्रमुख श्री. अनिल महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील सरकारी शाळांमध्ये सीबीएसई (CBSE ) पॅटर्न आणि परकियांच्या धंद्यासाठी मराठी संस्कृतीचा बळी

महाराष्ट्रातील सरकारी शाळांमध्ये सीबीएसई (CBSE) पॅटर्न लागू करण्यास सुकाणू समितीकडून मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे आता आगामी २०२५-२६ शैक्षणिक वर्षापासून सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याच्या तयारीस सुरुवात झाली आहे. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांनी विधान परिषदेत यासंदर्भात माहिती दिली असून, भाजप आमदार प्रसाद लाड यांनी या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर मंत्री भुसे यांनी लेखी उत्तर दिले आहे. त्यामुळे आता शिक्षणाची नवी पद्धत कशी असेल अन त्यासाठी काय तयारी करावी लागेल, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आगामी अभ्यासक्रमामध्ये ७०-३०% चा फॉर्म्युला राबवला जाणार आहे. यामध्ये ७०% अभ्यासक्रम सीबीएसई पॅटर्नचा असेल, तर ३०% राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असेल. म्हणजे आमच्या मुलांनी ८०% परकिय इतिहास आणि संस्कृती शिकायची आणि फक्त ३०% म्हणजे पुसटसा मराठी इतिहास आणि संस्कृती शिकायची. म्हणजे महाराष्ट्राचा ऐवढा मोठा गौरवशाली इतिहास असताना ३०% भागात ओझरता उल्लेख छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, ताराराणी अन मराठा साम्राज्याच्या इतिहासावर असणार आहे. यामुळे राज्याचा ऐतिहासिक वारसा पुसला जाणार आहे. त्याच वेळी साहित्यिक वारसाची ही बोंबाबोंब असेल कोण ज्ञानेश्वर, नामदेव तुकाराम कोण बहिणाबाई कोण वि.वा. आणि पु.ल. आणि कोण अत्रे आणि कोण आ.ह. साळुंके.

**आमच्या मुलांना कोणाचा इतिहास शिकवला जाणार तर आर्यांचा, मोर्यांचा, गुप्तांचा, कुषाण आणि शकांचा, अलेक्झांडर, सुलतान, मुघल आणि इंग्रज, गांधी, नेहरू, पंडित दिनदयाल शर्मा आणि एखादा वर्मा नाहीतर दुबे नाहीतर चौबे. कुठेही मराठा साम्राज्य आणि शिवछत्रपतींचा उल्लेख नसणार.**

### यंदा सीबीएसई अभ्यासक्रम पहिली इयत्ता पासून लागू

यंदा सीबीएसई अभ्यासक्रम पहिली इयत्ता पासून लागू होईल अन् नंतर प्रत्येक इयत्तेसाठी अभ्यासक्रम बदलला जाईल. राज्य शिक्षण मंडळाला नव्या पाठ्यपुस्तकांची छपाई करण्याची जबाबदारी दिली जाईल. शाळा १ जूनला सुरू झाल्यावर शिक्षकांना नवीन अभ्यासक्रमासाठी त्वरित प्रशिक्षण दिले जाईल. दरम्यान, शालेय वर्षाच्या वेळापत्रकावरदेखील गोंधळाची स्थिती आहे. मार्च महिन्यात शिक्षण विभागाने अचानक पहिली ते नववी इयत्तेपर्यंतच्या वार्षिक परीक्षा एप्रिलच्या अखेरीस घेण्याची सूचना दिली. यामुळे शैक्षणिक वर्तुळात गोंधळ उडाल्याचे दिसून आले आहे. शिक्षक व पालकांनी वार्षिक परीक्षा पूर्वीच्या वेळापत्रकानुसार घेण्याची मागणी केली आहे.

धन्यवाद!

आम्ही फक्त मराठीच

# सत्तेच्या सावलीत वाढणारी गुंडगिरी: महाराष्ट्रातील राजकारणाचा कटू आरसा

## महाराष्ट्रात यशस्वी राजकारणी होण्यासाठी तुम्ही यशस्वी गुंड असणे आवश्यक आहे...

## ही पद्धत देशभरात सुद्धा आहे, पण आपला संबंध महाराष्ट्राशीच येतो, म्हणून फक्त महाराष्ट्र...

**तुम्ही अट्टल गुंड नसाल, तुमची कोणतीही गँग नसेल, तुमचे बेकायदेशीर धंदे नसतील, खंडणी गोळा करत नसाल, हफ्ते घेत नसाल, अगणित काळा पैसा नसेल, तुमच्याकडे हाणामारीसाठी कायम तयार असणारे कार्यकर्ते नसतील तर, तुम्ही कधीच यशस्वी राजकारणी बनू शकत नाही... कारण या गोष्टी असल्याशिवाय मराठी माणसाला तुम्ही राजकारणी असल्याची जाणीवच होत नाही...**

तुमची दहशत असली पाहिजे, तुम्ही एखाद्या क्रूर राजासारखे वागले पाहिजे; तरच, मराठी माणसाला तुमच्यात एक चांगला राजकारणी दिसतो... हा नियम ग्रामपंचायतीच्या सरपंचापासून आमदार खासदारांपर्यंत आणि निवडणून न आलेल्या सर्व मोठ्या राजकारण्यांसाठी लागू आहे... आपल्या राज्यातील जवळ जवळ प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि त्याच्या खालोखाल असणारे एक दोन स्तरावरचे नेते हे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपली स्वतंत्र गँगच चालवत आहेत. आणि त्यांची अशी गँग आहे म्हणूनच ते आपल्याला राजकारणी म्हणून योग्य वाटत आहेत.

मी उद्या जर एखाद्या राजकारण्याला उद्धट बोललो, रागात बोललो, त्याच्या बेकायदेशीर धंद्यांना विरोध केला तर, मला रात्रीत गायब करण्याची त्याची ताकद असली पाहिजे तरच मला तो माझा नेता वाटतो... नाहीतर तो एक नेभळट माणूस असतो... ही आपली मानसिकता आहे...

**साधी मारुती अल्टो वापरणारा, प्रामाणिक, कुणाच्याही वाटेल न जाणारा, सौम्य भाषेत बोलणारा एखादा तरी नेता दिसतो का आपल्या आसपास? चुकून अशा एखाद्या व्यक्तीने राजकारणात येण्याचा प्रयत्न केला तर आपणच ''लायकी नाही आणि आला नेता बनायला'' असंच आपण म्हणतो. कारण आपल्या दृष्टीने राजकारणी हा गुंडच असला पाहिजे आणि तो आपल्या सर्वांपेक्षा श्रीमंतसुद्धा असला पाहिजे... ही मानसिकता मराठी माणसात एवढी भिनली आहे की तुम्ही चांगले व्यक्तिमत्व असाल तर सोशल वर्क करा आणि गुंड असाल तर राजकारण करा अशी विभागणीच आपण करुन घेतलेली आहे.**

गुंडगिरी करणारे, लोकांच्या जमिनी लाटणारे, खंडण्या गोळा करणारे, लूटमार करणारे, अड्डे-गुत्ते चालवणारे, हफ्ते गोळा करणारे सगळे लोक हे आपल्या स्थानिक राजकारण्यांचेच चेले आहेत, हे आपल्या सर्वानाच माहित आहे आणि तरीही आपण तोंड वर करुन त्यांनाच साहेब साहेब म्हणून आदर देत आहोत...

ग्रामीण भागात तर, आणखी भयानक परिस्थिती आहे, तिथे मोठा नेता बनण्यासाठी तुम्ही किमान दोनचार हाफ मर्डर केलेले असणे आवश्यक आहे... मर्डर केलेला असेल तर, विषयच मोठा आहे, जेवढे जास्त मर्डर तेवढा मोठा नेता हा नियम आहे, ग्रामीण राजकारणाचा. तरुणांसाठी असे लोक आदर्श नेते असतात. मर्डर करतो म्हणजे भारी, साधा नियम. तो मर्डर करूनही चार महिन्यात जामिनावर तुरुंगातून बाहेर येतो, आणि पुढे आयुष्यभर बाहेरच राहतो, हेच त्याच कर्तृत्त्व असतं आणि आपल्या न्यायव्यवस्थेचं अपयश असतं... शहरांमधे अशा मर्डरला लोक थोडे गांभीर्याने घेतात म्हणून मग शहरातले राजकारणी वेगवेगळ्या गँग पोसतात आणि त्यांच्या



माध्यमातून हे काम करवून घेतात. लोकांनाही माहित असतं कोणत्या गँगला कोणत्या नेत्याचे अभय आहे ते; पण, तेच तर त्याचे कर्तृत्व आहे...

**पण, ही मानसिकता आता शहरांमध्ये सुद्धा पसरली आहे. १५-१८-२०-२५ वयाचा जवळजवळ प्रत्येक पोरगा हा आता कोणत्यातरी एखाद्या मोठ्या गुंडाचा फॉलोअर आहे, चाहता आहे. मर्डर हाफ-मर्डर करणारे, आपल्या गँग घेऊन मिरवणूक काढणारे, दहशत निर्माण करणारे हे सगळे या पिढीचे आदर्श नेतृत्व आहेत. आपली पोरं काय करतात, कुणाला फॉलो करतात, कोणत्या भाषेत बोलतात हे पालकांना माहीतच होत नाही, माहित झालं तरी त्यांना काही फरक पडत नाही.** या पोरांचे नुसते WhatsApp ग्रुप जरी पाहिले, तरी पालकांना अटॅक येईल एवढी भयानक परिस्थिती आहे. सणासुदीला, जयंत्या, पुण्यतिथीला DJ सारख्या झुंडींना एकत्र आणणाऱ्या व्यवस्थेच्या माध्यमातून संघटित गुन्हेगारी कशा प्रकारे वाढवली जात आहे आणि या गुन्हेगारांचे फॉलोअर्स कशा प्रकारे तयार केले जात आहे हे अजून कुणाच्या लक्षात आलेले नाही, आणि जेव्हा येईल तेव्हा फार उशीर झालेला असेल. कोवळ्या वयाची पोरं नशेखोर झाली आहे, हत्यारे घेऊन हाणामाऱ्या करायला लागली आहेत, अगदी हत्या करायला लागली आहेत, सुपाऱ्या द्यायला लागली आहेत, घाणेरड्या अश्लाघ्य शिव्या सामान्य झाल्या आहेत. आणि हे सगळं पाझरतंय ते आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून...

**हे राज्य आत्ता आत्ता बिघडलेलं नाही, मी कळत्या वयापासून राज्यात हेच पाहत आलेलो आहे, आपल्या मागच्या पिढ्यानी सुद्धा हेच पाहिलेलं आहे, फक्त त्यावेळेस लपून छापून चालू असायचं आणि आता उघडपणे चालू आहे एवढाच काय तो फरक... त्यावेळी गुंड असणारे, डोक्यावर दोनचार मर्डर असणारे बरेचजण आता मोठे राजकारणी झाले आहेत आणि आपण त्यांना माझे दैवत म्हणून मिरवत आहोत...**

आपण एका राजकीय विकृतीचा भाग झालो आहोत... ही विकृती आता वेगाने वाढायला लागली आहे आणि ही विकृती जनतेलाच आवडायला लागली आहे....

*...श्रीकांत आव्हाड*

---

''परमेश्वर मरुन गेलाय आणि मी मेलेल्या परमेश्वराचा उत्तराधिकारी आहे'', असं गर्जून सांगणारा १९ व्या शतकातला महान विचारवंत फ्रेडरिक नित्शे म्हणून गेलाय की, ''आपण ईश्वराचे 'गुलाम' झालेलो आहोत...आपल्याला जर जीवनात सुखशांति-समाधान मिळवायचं असेल; तर, आपल्याला ईश्वरापासून मुक्ति मिळवायला हवी''...हाच नित्शे पुढे जरा अधिककाळ जगला असता किंवा 'जगात देव आहे किंवा नाही', या व्यर्थ चिंतनात अजिबात वेळ न दवडता जगतकल्याणासाठी आपलं संपूर्ण आयुष्य पणाला लावणाऱ्या गौतम बुद्धाचा पुनर्जन्म...भांडवली-युगात पुन्हा पृथ्वीवर झाला असता; तर, दोघेही एकासुरात म्हणाले असते, ''आपण 'भांडवलशाही'चे 'गुलाम' झालेलो आहोत...आणि, आपल्याला जर जीवनात सुखशांति-समाधान मिळवायचं असेल; तर, आपल्याला 'भांडवलशाही'पासून मुक्ति मिळवायलाच हवी!''

*...राजन राजे*

---

एकदा का सगळीच व्यवस्था निव्वळ 'खाजगी-नफा' कमावण्याच्या (बऱ्याचदा, नफा कमावण्याच्या नव्हे; तर, एकूणएक सगळ्या संधि साधत वा संधि निर्माण करत नीतिशून्य व्यवहारातून नफा ओरबाडण्याच्या) आसाभोवती फिरायला लागली किंवा तेच एकमेव साध्य बनलं की, 'मानवी-जीवना'ची महती झपाट्याने घटायला लागते... संवेदनांचे पंख आपसूक मिटायला लागतात. चराचरसृष्टीत परमात्म्याचं रूप पहाण्याची आध्यात्मिक-संकल्पना साफ अडगळीत पडते आणि पैसा हाच 'परमात्मा' बनतो! खाजगी नफ्याच्या-पैशाच्या लालसेमुळे येणारं आंधळेपण, जगाचं 'सम्यक-दर्शन' नाकारतं! ''जगा, जगवा आणि जगू द्या'', ही जगण्याची त्रिसूत्री 'भांडवली-जगता'साठी एकदम त्याज्य, टाकाऊ, तकलादू ठरते...भांडवली-व्यवस्थेच्या प्रस्थापनेसाठी, अतिक्रमण-संक्रमणासाठी ती पावलोपावली अडचणीची ठरत जाते!

*...राजन राजे*

# आमदार कॉ. लहानू कोम....

१९७५ सालच्या सुमारास आम्ही ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी तालुक्यांमधे फिरत असू. अरुण प्रधान, अनिल शाळिग्राम, रवी जोशी, अनिल क्षीरसागर, अशोक परांजपे, असे मित्र सोबत असत. एकदा तलासरी तालुक्यात गेलेलो असताना भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आमदार लहानू कोम यांच्या घरी जाऊन मुलाखत घेतलेली आठवते.

साधीशी पण स्वच्छ झोपडी, मंद प्रकाश, शेणाने सुरेख सारवलेली जमीन, एका साध्याशा खुर्चीवर बसलेले पंचविशीतले विनम्र आमदार, अंगावर पांढरा हाफशर्ट आणि खाकी हाफपॅन्ट, लहानखुरा देह, असं स्मृतिचित्र अंधूक आठवतं.

**''तुम्हाला आमदार म्हणून जे मानधन मिळतं, ते तुम्ही कसं खर्च करता?'' असा प्रश्न मी त्यांना विचारला होता. यावर ''आम्ही ते पक्षाकडे जमा करतो. त्यातले थोडे पैसे पक्ष आम्हाला खर्चासाठी देतो'', असं उत्तर त्यांनी दिलं होतं. 'ठाणे वार्षिक' नावाच्या आमच्या दिवाळी अंकात ही मुलाखत प्रसिद्ध झालली असावी. त्या काळात तलासरीमधे रात्रीच्या अंधारात ओबडधोबड रस्त्यावरून चालताना, ओंजळीत चमचमणारे काजवे घेऊन वाट शोधणारे गरीब आदिवासी बांधव आठवतात...**

यानंतर पन्नास वर्षं गेली. अलिकडे दोनचार वर्षांपूर्वी मी प्रा. रमेश पानसे सरांच्या आदिवासी आश्रमशाळेत पालघरला गेलो असताना, त्यांचे जवळचे सहकारी श्यामदादा यांच्याकडे लहानू कोम यांची चौकशी केली. ''ते आता active नाहीत'' एवढंच त्रोटक उत्तर मिळालं. तिथल्या नव्या पुलाला 'कॉ. गोदुताई परुळेकर उड्डाणपूल' नाव दिलेलं दिसलं.

दोन दिवसांनी संध्याकाळच्या सुमाराला आम्ही रिक्षातून जात असताना अचानक श्यामदादा म्हणाले, ''ते बघा लहानू कोम !'' मी बाहेर पाहिलं...अंधारात एक साधीशी, लहानखुर व्यक्ती एकटीच रस्त्याच्या कडेने चालली होती. माझे डोळे निष्कारण भरुन आले...

***...सुनिल कर्णिक*** (९९३०० १९०६०)

(मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नव्वदीतले माजी आमदार/ खासदार कॉ. लहानू कोम यांची, शब्दात लहान पण संदेशात महान असलेली, एक आठवण सांगताहेत...**एक अत्यंत संवेदनशील लेखक, परीक्षक व साहित्य क्षेत्रातील दिग्गज सर्वश्री सुनिलजी कर्णिकसाहेब...लहानू कोम यांच्यासारखी जातिवंत समाजवादी–साम्यवादी मंडळी, आता विधिमंडळ सभागृहात महाराष्ट्राची जनता निवडून पाठवत नाही, हे महाराष्ट्राचं मोठं दुर्दैव आहे...ही मंडळी, विधिमंडळ–सभागृहाबाहेरच कुठेतरी आदिवासी भागात, अन्य ग्रामीण श्रमिकवर्गात अन्यथा कुठेतरी शहरीभागात...'आऊटसोर्सिंग व कंत्राटी–कामगार' पद्धतीचा 'भांडवली–हल्लाबोल' झाल्याने विकलांग बनलेली कुठलीशी युनियन जेमतेम चालवताना दिसतात...आणि, मराठी जनता सुजाण बनून कधि आपल्याला राजकारणात संधि देते; याची चातकासारखी वाट पहात सभागृहाबाहेर दीर्घकाळ तिष्ठत उभे रहातात...शेवटचे गणपतराव देशमुखसुद्धा आता सभागृहात अपवाद म्हणून राहिलेले नाहीत आणि म्हणूनच, महाराष्ट्राच्या विधिमंडळातल्या महिला–आमदारांची भाषादेखील टपोरी, अश्लाघ्य झालीय...महाराष्ट्राची एकूणच राजकीय परिस्थिती अत्यंत गंभीर व स्फोटक बनत चाललीय!** लहानू कोम, गणपतराव देशमुखांची सुसंस्कृत परंपरा खंडित झाल्यानं, विधिमंडळात व विधिमंडळाबाहेर गुन्हेगार लोकप्रतिनिधींची एकच वावटळ सध्या महाराष्ट्रात उठलीय. राजकीय क्षेत्रात मोठा दबदबा असलेला गुन्हेगारांचा 'बादशहा', ज्याला हल्लीच्या परिभाषेत 'आका' म्हणतात; तो फक्त बीडमध्येच नसतो; तर, प्रत्येक जिल्हाच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी, त्याचा नरभक्षी बिबळ्यासारखा दक्षिणेतल्या कोकणापासून उत्तरेतल्या ठाण्यापर्यंत महाराष्ट्रभरात सर्वत्र मुक्त वावर असतो. एखादी अंजली दमानिया नेट लावून धरते म्हणून 'बीड' हे, गुन्हेगारांचं 'अभयारण्य' म्हणून आपल्याला परिचित तरी होतं; पण, जरा नीट तपासून पाहिलं तर, संपूर्ण महाराष्ट्रच गुन्हेगारांचं 'निबीड अरण्य' आहे, हे आपल्या ध्यानात आल्यावाचून रहाणार नाही!

**हा आमच्या 'शिवबा'चा महाराष्ट्र नाही...संतांचा तर नाहीच नाही. आजचा महाराष्ट्र, हा क्रूरकर्मा औरंगजेबाचा आहे. सखेद आश्चर्य म्हणजे, व्यवहारतः 'औरंगजेब' असलेलेच शिरा ताणून ताणून रोज टीव्हीवर येऊन औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची अत्यंत निरर्गल 'राजकीय–नौटंकी' करत असतात...सांगा, कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र आमचा? आता, दोनशे–चारशे गुंडांच्या सशस्त्र टोळ्या उजळमाथ्याने बाळगणारे आणि म्हणूनच, कुणालाही उचलून नेऊन नाहीसं करण्याची सैतानी–क्षमता असणारे राजकीय–पुढारी नावाचे 'पेंढारी'...नगरसेवक, आमदार, खासदार, मंत्रीच नव्हे; तर, थेट मुख्यमंत्री–उपमुख्यमंत्री होताना पहाण्याचं दुर्भाग्य महाराष्ट्राच्या लाल–काळ्या मातीच्या ललाटी लिहीलं जातंय...**कधिकाळी शिवबा–संतांच्या महन्मंगल मराठी–संस्कृतीशी नातं सांगणारी ही महाराष्ट्राची लालकाळी माती; आता कूस बदलून गुंडपुंड, खंडणीखोर खुन्यांशी सोयरिक जमवून बसलीय...राजकीय कूस बदललेल्या त्या मराठीमातीला, खांद्यावर क्रूस घेतलेला येशू नकोय; हाती नंग्या तलवारी, चॉपर, कोयते घेतलेले गँगस्टर हवेत...जणू तिला प्रेमाऐवजी रक्ताची तहान लागलीय.

कॉ. लहानू कोम, कॉ. गणपतराव, कॉ. कृष्णा खोपकर, कॉ. कृष्णराव धुळप, कॉ. गोदुताई परुळेकर यांनी महाराष्ट्रात सकस राजकीय–संस्कृती रुजवली, वाढवली...तर नारायण राणे, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, धनंजय मुंडे, रामदास कदम, प्रताप सरनाईक यांनी ती साफ सडवली, बिघडवली!

एखादा न्यूझीलंडचा किंवा नॉर्वेसारख्या स्कँडेनेव्हियन देशाचा पंतप्रधान पदावरुन पायउतार होताच सायकलीने वा बसने कसा फिरतो, याचं रसभरित कथावर्णन केलं जातं; पण, आपल्याच महाराष्ट्राच्या मातीत उगवून कातरवेळेकडे झुकलेल्या वा गाडल्या गेलेल्या लहानू कोम, गणपतरावांसारख्या संजीवक जडीबूटीकडे आपलं लक्ष वेधलं जात नाही...सुनिलजी मात्र, खालील छोटेखानी किस्सा सांगत, बोट धरुन आपल्याला त्या विस्मृतीत गेलेल्या अभिमानास्पद घटनाक्रमाकडे खेचून नेतायत, हे निःसंशय स्पृहणीय होय...धन्यवाद!

***....राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

# तुला धर्माची काय महती...???

*मित्र म्हणाला,*
*''तू तर मार्क्सवादी!*
*म्हणजे धर्मविरोधी.*
*म्हणजे जडवादाची सद्दी.*
*तुला धर्माची काय महती?''*

*मी हसलो आणि म्हणालो,*
*''मार्क्सनेच मला कर्मठ केले!*
*स्थूलाकडून सूक्ष्मात नेले!*
*चित्तशुद्धीचे मार्ग शिकवले!*
*पूर्वीपेक्षा अधिक धार्मिक बनवले!''*
*''काय?'' मित्राने आश्चर्य केले.*

*मार्क्स म्हणाला,*
*''निर्भयतेने सत्य ओळख!*
*लुटीला लूट म्हण...*
*शोषणाला शोषण म्हण...*
*तुझ्या जातीने केले तरी म्हण...*
*तुझ्या खानदानाने केले तरी म्हण...*
*सत्य बोलण्याचे व्रत घे!*
*तोच तुझा स्वधर्म आहे!*
*लक्षात ठेव,*

*शोषित असंख्य असले तरी शोषक मुठभरच असतात.*
*शोषितांच्या भ्रमानेच ते राज्य करतात.*
*म्हणून शोषितांचा भ्रम तोड.*
*'वरकड–मुल्या'चे रहस्य फोड.*

*किर्तने कर, प्रवचने कर...*
*मग हिंसेचा अंत होईल...*
*अहिंसेचे राज्य येईल...*
*तोच तुझा स्वधर्म आहे!*
*'सब है भूमी गोपाल की*
*नही किसीकी मालकी',*
*हे लक्षात घे.*

*म्हणून तुझ्या संपत्तीचा धांडोळा घे.*
*तुझ्या श्रम–पैशाचा ताळमेळ घे.*
*अस्तेयाचे व्रत घे.*
*तोच तुझा स्वधर्म आहे!*
*भांडवलाचे केंद्रीकरण होऊ देऊ नकोस.*
*म्हणून तू देखील लोभाला बळी पडू नकोस.*
*तेच अनर्थाचे मूळ आहे.*

*साऱ्या दुःखाचे कारण आहे.*
*म्हणून अपरिग्रहाचे व्रत घे.*
*तोच तुझा स्वधर्म आहे!*
*सुखाची पर्वा तू करु नकोस.*
*भोगाची आस तू बाळगू नकोस.*
*मायावी दुनियेला फसू नकोस.*
*जनतेतला जनार्दन विसरु नकोस.*
*त्याच्याच मध्ये मिसळून जा.*
*सायुज्य मुक्ती अनुभवत जा.*
*तेच तुझे प्रारब्ध आहे.*
*तोच तुझा स्वधर्म आहे.''*

***...डॉ. रुपेश पाटकर***

*(जर्मन तत्त्वज्ञ डॉ. कार्ल मार्क्स यांच्या पुण्यतिथीनिमित्त (१४ मार्च) त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!)*

# ‘महावीर’चे विरमरण

**२३ मार्च.... भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या महान हौतात्म्याचा दिवस. पण हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनच्या केवळ याच तिघांनी भारतमातेच्या सुटकेसाठी बलिदान दिले असे नाही, चंद्रशेखर आझाद, भगवतीचरण व्होरा यांचे बलिदानदेखील आपल्याला माहीत आहे. पण त्याही पुढे म्हणजे हिंदुस्थान सोशालिस्टच्या बाकीच्या क्रांतिकारकांना जेव्हा जन्मठेपा देऊन ब्रिटीश सरकारने अंदमानात पाठवले गेले, तेव्हा त्यांनी तिथे प्रखर अन्नसत्याग्रह केला. या अन्नसत्याग्रहात आणखी तिघांनी हौतात्म्य पत्करले, महावीर सिंग, मोहित आणि मोहन यांनी! त्याच बलिदानाविषयीचा हा मजकूर. भगतसिंगांच्या साथीदारांच्या काळ्यापाण्याच्या शिक्षेची गोष्ट ‘अंदमानचे क्रांतिकारक’ या मनोविकास प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात मी मांडली आहे!**

आणखी दोघांची आहुती!


फुप्फुसात दूध पोचल्यावर काही क्षणातच महावीर यांची शुद्ध हरपली. त्यांची तब्येत ढासळतेय हे जरी डॉक्टरना जाणवले तरी परिस्थितीचे पूर्ण गांभीर्य त्यांच्या लक्षात आले नाही. त्यांनी स्ट्रेचरवरून महावीरना हॉस्पिटलात हलवले. त्यांना तसे नेताना पाहून घडलेला प्रकार बाजूच्या कोठड्यांतील सहकाऱ्यांच्या लक्षात आला. जवळपासच्या इतर कोठड्यांतील सहकाऱ्यांना हे कळावे म्हणून त्यांनी मोठ्याने ओरडून सांगितले.

विजयकुमार लिहितात, **‘‘डॉक्टरांनी महावीरच्या बिघडलेल्या प्रकृतीची गांभीर्याने दखल घेऊन त्याला वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न करावेत म्हणून सोबत्यांनी ओरडून सांगण्याचा प्रयत्न केला. पण कोणीच प्रतिसाद दिला नाही. काही वेळाने ड्युटीवरचा एक वार्डर फक्त आला आणि म्हणाला, ‘‘बाबू, आप लोगों का भाई बिमार हो गया है।’’ त्याच्या या वाक्याने सर्वांच्या लक्षात आले की महावीर कायमचा सोडून निघाला आहे.**

**हॉस्पिटलमध्ये महावीरचे काय झाले, त्याच्या शेवटच्या क्षणात त्याच्यावर काय उपचार करण्यात आले, हे आजच्या दिवसापर्यंत कोणालाच निश्चितपणे कळले नाही. त्याच्या पार्थीवाचे शेवटचे दर्शनदेखील सहकाऱ्यांना घेऊ दिले गेले नाही.**

जेव्हा अन्न सत्याग्रह संपला तेव्हा आम्हांला कळले की, त्याचे पार्थिव जड दगडांना बांधून पहाटेच्या काळोखात समुद्रात फेकून देण्यात आले. फुले नाहीत की श्रद्धांजलीचे चार शब्द नाहीत. जे पार्थिव देशाने पुजले असते, ज्याचे चिरस्मारक करून देशाने जपले असते, ते माशांनी खाण्यासाठी समुद्रात फेकण्यात आले. महावीरप्रमाणेच त्याच्या जीवश्चकंठश्च सहकाऱ्यांच्या भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरुच्या पार्थिवांबाबत सरकारने हेच केले होते. त्यांच्या मृतदेहांचे तुकडे करून त्यावर केरोसिन ओतून घाईघाईने ते जाळून टाकण्यात आले होते.’’

**उपोषण सुरू झाल्यापासून दररोज रात्री आठ वाजता आंदोलक घोषणा देत. महावीर गेले त्या रात्री आठचा भोंगा वाजताच ‘इन्किलाब झिंदाबाद’ च्या घोषणांनी अख्खा तुरुंग दणाणून गेला. जे अशक्त होते तेदेखील कोठड्यांच्या दारावर उभे होते. त्यांच्या पहील्या घोषणेचा आवाज निनादत असतानाच दुसऱ्यांदा ‘इन्किलाब झिंदाबाद’चे तरंग उठले. दुसरी घोषणा विरत नाही तोच तिसऱ्यांदा ‘इन्किलाब झिंदाबाद’ची घोषणा झाली. तीन घोषणानंतर पुन्हा सर्वत्र शांतता पसरली. तुरुंगाच्या**



**पलिकडे अथांग समुद्र होता. दूरवर किंग्ज पॅलेस या मुख्य कमिशनरच्या बंगल्यातील दिवे मिणमिणत होते. सर्वजण महावीर सिंगांच्या आठवणीत बुडून गेले होते.**

महावीर सिंगांच्या बलिदानानंतर उपोषण करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत गेली. ही संख्या तेहतीसवरुन पन्नासवर गेली.

याच काळात अन्न सत्याग्रहींच्यानावे शांतिनिकेतनमधून रविंद्रनाथ टागोरांची तार आली. याचा अर्थ भारताच्या मुख्य भूमीपासून शेकडो मैल दूर समुद्राने वेढलेल्या या बेटावरील अन्न सत्याग्रहाची बातमी तुरुंगाच्या उंच भिंती पार करून भारतात पोचली होती. टागोरांनी अन्न सत्याग्रह थांबवण्याची विनंती केली होती. टागोरांविषयी आदर होता, पण त्यांची विनंती मान्य करणे शक्य नव्हते. विजयकुमार लिहितात, ‘‘असे करणे कसे शक्य होते? आंदोलकांनी त्यांचा एक साथी गमावला होता. आता तडजोडीचा किंवा तहाचा विचार करणे शक्यच नव्हते. आता प्रश्न भारतीय क्रांतिकारकांच्या प्रतिष्ठेचा होता आणि त्यासाठी त्यांनी आपले प्राण पणाला लावले होते. सत्याग्रहींविषयी टागोरांना वाटणारी काळजी त्यांना समजत होती, परंतु त्यांच्या विनंतीप्रमाणे वागणे मात्र शक्य नव्हते. त्यांच्या तारेला उत्तर पाठवण्यात आले. ते त्यांच्यापर्यंत पोचले की नाही कोण जाणे.’’

आता दिवस कसेतरी जात होते. अधिकारी आंदोलकांचे मनोधैर्य खच्ची करण्याचा सतत प्रयत्न करत होते. उपोषण मागे घेतले जावे यासाठी त्यांचे हरतऱ्हेचे प्रयत्न चालू होते.

वरीष्ठ मेडिकल ऑफिसर हा युरोपियन माणूस होता. तो अतिशय बेफिकीर होता. पण महावीर सिंगांच्या मृत्यूनंतर तो आतून हादरला होता. ‘‘त्याला माहीत होते की आंदोलकांना मरायची संधी दिल्याबद्दल आणि त्यामुळे देशभर असंतोषाचे लोण पसरवल्याबद्दल त्याला जबाबदार धरले जाईल,’’ विजयकुमारांनी लिहीलेले हे वाक्य वाचताना माझ्या मनात एक प्रश्न डोकावून गेला. दळणवळणाची साधने अतिशय मागासलेली असताना, बहुतांशी देश दरिद्री असताना, दोन वेळचे जेवण कसे मिळेल याची भ्रांत असताना देशवासी त्यांच्या क्रांतिकारकांच्या हालअपेष्टांच्या बातम्यांनी अस्वस्थ होत होते. राज्यकर्त्यांना त्यांच्या असंतोषाची भिती वाटत होती. पण आज मोबाईलद्वारे सर्व माहीती आमच्या मुठीत असताना दोन वेळच्याच नव्हे तर दोन पिढ्यांच्या जेवणाची तजवीज झालेली असताना आम्ही आजचे मध्यमवर्गीय असा विचार करू का?

विजयकुमार लिहितात, ‘‘सरकारची प्रवृत्ती पाहता आमच्या क्रांतिकारकांना जाणवले की एक बलिदान पुरेसे नाही. आणखी काही बलिदाने व्हायला हवीत. त्यासाठी जवळपास सगळेच प्रयत्न करत होते आणि शेवटी त्यात मोहित आणि मोहन यशस्वी झाले.’’

कसले हे यश? बळी जाण्यात यशस्वी होण्याचे यश! मला खरोखरच कळत नाही की ही माणसे होती की स्थितप्रज्ञ अवस्था प्राप्त झालेले संत? मला हे वाचून धक्का बसला की स्वतःचा बळी द्यायला निघालेल्या मोहित आणि मोहनची शिक्षा संपत आली होती. लवकरच त्यांची सुटका होणार होती. विजयकुमार लिहितात, ‘‘पण ते बंगाली तरुण होते ना. बंगाली तरुणांनी शौर्याने संघर्ष करत शांतपणे मृत्यूला कवटाळत इतिहास घडवला होता. त्यांच्या या धीरोदात्त बलिदानाला त्यांच्या शत्रूनीदेखील आदराने अभिवादन केले होते. त्यांच्या रक्ताने लिहिला गेलेला इतिहास आमच्या क्रांतिकारी संघर्षाचे दैदीप्यमान पर्व आहे.’’

मोहित आणि मोहन हे उमदे तरुण होते. जेलच्या कष्टमय जीवनात देखील त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी हास्य असे. याचा अर्थ असा नव्हे की ते गांभीर्याने विचार करत नसत. एखादा गंभीर विषय असे तेव्हा त्यांचे चिंतन मोलाचे असे. त्यांचे अनेक मित्र त्यांच्या हसतमुख चेहऱ्याची आजदेखील आठवण काढतात. त्यांच्या निरागस स्वभावाचे किस्से सांगतात. मोहितचा आवाज खूप गोड होता. हिंदुस्तानी गझल तो गात असे. त्याचे गाणे त्या निराशेच्या वातावरणात उमेद जागवे.’’

**मोहित आणि मोहनचे बलिदान महावीरसारखेच झाले. जबरदस्तीने त्यांना दूध भरवले जात असताना त्यांनी निकराचा प्रतिकार केला आणि त्या झटापटीत अन्ननलीकेत ट्युब जाण्याऐवजी श्वासनलीकेत गेली. त्यात दूध भरले गेले. भयंकर घुसमट सहन करत ते बेशुद्ध झाले. त्यांना जेल हॉस्पिटलात हलवण्यात आले. इंजेक्शन व ऑक्सिजन देऊन त्यांना वाचवण्याचा निष्फळ प्रयत्न करण्यात आला. विजयकुमार लिहितात, ‘‘मृत्यूने, तेजस्वी मृत्यूने त्यांना आपल्या कवेत घेतले. तो त्यांना त्यांच्या सोबत्यांपासून दूर घेऊन गेला. इतर क्रांतिकारकांना संघर्ष चालू ठेवण्यासाठी मागे सोडून मोहित आणि मोहन हुतात्म्यांच्या रांगेत जाऊन बसले!’’**

*...डॉ. रुपेश पाटकर*

# जन सुरक्षा नव्हे, सजग जनांना शिक्षा!




''अर्बन नक्षलवाद नियंत्रणाच्या नावाखाली विरोधकांचे निर्दालन!'' या गोंडस नावाखाली नवीन हुकुमशाही कायदा अस्तित्वात आला तर कोणत्याही व्यक्ती किंवा संघटना यांना कोणत्याही विषयावर शासनाविरुद्ध बोलता येणार नाही. एका बाजूला केंद्र सरकार 'अर्बन नक्षल' अशी कुठली व्याख्या अस्तित्वात नाही असे वर्तमानपत्रातून जाहीर करते; तर दुसऱ्या बाजूने राज्य सरकार मात्र 'अर्बन नक्षल' विरोधात कायदा आणते! याचा अर्थ काय? शासनाला अमर्यादित अधिकार **देणाऱ्या या कायद्यावर हरकती सूचना देण्याची अंतिम तारीख १ एप्रिल २०२५ आहे. या कायद्याचे नाव ''महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा अधिनियम''असे ठेवलेले असले तरी तो जनतेची सुरक्षा करणारा आहे असे म्हणता येणार नाही. कारण हे विधेयक काही मूलभूत लोकशाही मूल्यांविरुद्ध आहे. यातील ''बेकायदेशीर कृत्य'' याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने किंवा संघटनेने केलेली सरकारविरोधी शाब्दिक वा आंदोलनकारी कृती, असा लावला गेला आहे. विशेष म्हणजे या कायद्यात बेकायदेशीर कृत्याची व्याख्याच दिलेली नाही. त्यामुळे सरकारच्या मनाला वाटेल तेच बेकायदेशीर कृत्य आहे, असे ठरवायला सरकार मोकळे! मग अशी बेकायदेशीर कृत्ये(!) करण्यासाठी पैसे किंवा वस्तू गोळा करणारे असो की तोंडी किंवा लेखी शब्दांद्वारे किंवा खुणा करून अथवा दृश्य सादरीकरणाद्वारे केलेले असो, ते सगळे या कायद्याखाली येईल.**

तसेच ''बेकायदेशीर संघटना'' याचा अर्थ, जी संघटना, सरकारच्या मते बेकायदेशीर कृत्य करण्यामध्ये गुंतलेली आहे किंवा तिच्या उद्दिष्टांनुसार-कोणतेही माध्यम, साधन किंवा अन्यथा यामार्फत प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे बेकायदेशीर कृत्य करण्यास प्रेरणा देते किंवा सहाय्य करते किंवा मदत करते, किंवा त्यास प्रोत्साहन देते, अशी कोणतीही संघटना, असा आहे. या विधेयकानुसार जो कोणी अशा बेकायदेशीर (!) संघटनेचा सदस्य असेल किंवा अशा कोणत्याही संघटनेच्या बैठकामध्ये भाग घेईल किंवा त्यांना देणगी देईल वा स्वीकारेल अशा लोकांना तीन वर्ष कारवास किंवा तीन लाख रुपये दंडाची शिक्षा होऊ शकेल.

या विधेयकाच्या द्वारे प्रशासनाला अतिरेकी अधिकार दिले जात आहेत. कोणत्याही व्यक्तीवर संशय आल्यास, त्याच्यावर कठोर कारवाई करता येईल, ज्यामुळे सरकारी यंत्रणा जनतेच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणू शकेल. विरोधी विचारसरणी किंवा सरकारविरोधी भूमिका घेणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनांना सहजपणे 'अन्याय्य' ठरवून त्यांच्या हालचालींवर निर्बंध आणता येऊ शकतात. हा प्रकार लोकशाहीत असलेल्या वैचारिक मतभेदांचा आदर न करणारा आहे. ही तर सरळसरळ अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी झाली.

या कायद्यात काही प्रकरणांमध्ये सरकारला न्यायपालिकेच्या भूमिकेत हस्तक्षेप करण्याचेही स्वातंत्र्य दिले गेले आहे, ज्यामुळे स्वायत्त आणि स्वतंत्र न्यायपालिकेचा पाया कमकुवत होईल. सरकारच्या धोरणांवर टीका करणे किंवा शांततापूर्ण आंदोलन करणे यांना 'अन्याय्य कृत्ये' म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकते, जे लोकशाहीत अभिप्रेत असलेल्या खुल्या चर्चेच्या तत्वाविरोधी आहे. विधेयकात काही तरतुदी अशा आहेत की ज्यामुळे मूलभूत हक्क जसे की अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि न्यायसंगत सुनावणीचा अधिकार यावर परिणाम होईल

**थोडक्यात म्हणजे हे विधेयक लोकशाही तत्त्वांना बाधा आणणारे आणि सत्ताधारी प्रशासनाला अतिरिक्त अधिकार प्रदान करून नागरिकांच्या हक्कांची गळचेपी करण्याचा धोका निर्माण करणारे आहे. तेव्हा सामान्य जनहो, या कायद्याला मोठ्या प्रमाणात विरोध करण्यासाठी जर तुम्ही जागे झाला नाहीत तर भारतात हुकूमशाहीचा दिवस दूर नाही.**

***– जगदीश काबरे***

आपण भयंकराकडे चाललो आहोत. काय बोलावं तेच कळत नाही. कोर्ट जर म्हणत असेल की, माणिकराव कोकाटेंना अपात्र ठरवलं तर, पुन्हा निवडणुका घेण्यात जनतेचा पैसा वाया जाईल तर या देशातलं संविधानाचं राज्य संपलं हे दाखवणारी ही घटना आहे.

उद्या जर एखाद्या आमदारानं बलात्कार केला तर, त्यालाही शिक्षा देऊ नये; कारण, त्याला शिक्षा दिली की, तो अपात्र ठरेल आणि पुन्हा निवडणुकीचा खर्च करावा लागेल.

मुख्याध्यापकानं दरोडा टाकला एखाद्या घरावर तर, त्यालाही बडतर्फ करू नये; कारण, नवा मुख्याध्यापक नियुक्त करण्यासाठी जाहिरात द्यावी लागेल आणि त्याचा खर्च जनतेच्याच पैश्यांमधून करावा लागेल.

मी तर म्हणतो कायद्यातच तशी सुधारणा करावी आणि शिक्षा द्यायचीच नसल्यानं मग न्यायाधिशांचं कामच राहणार नाही. सगळे न्यायाधीश सक्तीनं निवृत्त करून, सगळी न्यायालयंच बरखास्त केली तर, लोकांवरचा पगार, भत्ते, सुविधा यांच्या खर्चाचा बोजा हटून सर्वत्र आनंदीआनंद होईल.

***– विश्वंभर चौधरी***


लोकशाहीविरोधी 'जनसुरक्षा'

**दै. महाराष्ट्र टाइम्समधील संजयजी मंगो यांचा लेख... निवृत्त पोलिस महासंचालक प्रवीण दिक्षित यांच्या, जनसुरक्षा कायद्याची गरज सांगणाऱ्या लेखाचा त्यांनी केलेला जोरदार प्रतिवाद!**

**(आणि, त्यावर राजन राजे यांनी नोंदवलेली प्रतिक्रिया खालीलप्रमाणे....)**

सरकार, अपील करण्यासाठी सल्लागार मंडळ निवडणार म्हणे...ही असली सल्लागार वा कल्याण (Welfare) मंडळं, ही सरकारची बटीक म्हणूनच काम पहातात आणि ''अन्यायाच्या दारातच न्याय मागण्याची'' आफत एकप्रकारे पीडितांवर येत रहाते... हे कामगार कल्याण मंडळात वगैरे आम्ही पाहिलेलं आहे. कंपन्या-कारखान्यांमधून व्यवस्थापनाकडून पगार-भत्ते घेणारे I.O. काय दिवे लावतात... ते तर निलंबित कामगारांसंदर्भातील कंपनी-अंतर्गत चौकशीत कायमच दिसत असतं...तोच प्रकार सरकारी-पगारामुळे होणार व मर्जीतल्याच न्यायाधीशांची तिथे वर्णी लावली जाणार.

शिवाय, अशा मंडळांचा कारभार पुढे पुढे तर एकदम बेभरवशी, 'अल्ला भरोसे' होत जातो.

# मराठी मुस्लीम संस्कृतीवरील, उत्तरभारतीय घाला!

**'तमाम मस्जिदी व मदरशांमधून, उत्तर भारतीय इमाम हद्दपार करावे लागतील', अशा प्रकारची सूचना, मुस्लिम मान्यवरांच्या औपचारिक व अनौपचारिक बैठकीत, गप्पांच्या मैफलीत गेली पाच–सहा वर्षे, मी सातत्याने करीत आलो आहे...**

त्यासाठी कारणं म्हणून नोंदवलेली निरीक्षणं, वेळोवेळी अगदी विस्ताराने मांडलेली आहेत. त्याचा उल्लेख इथं करायचा नव्हता (कारण, परप्रांतीयद्वेषी म्हणून हिणवण्याची शक्यता अधिक) पण, हे नेतृत्व महाराष्ट्रातील लोकसंस्कृती, लोक-परंपरा आणि प्रादेशिकतेवर घाला घालत असेल; तर, त्यावर उघडपणे बोललं पाहिजे.

उत्तर भारताने, मुस्लिम समाजात बहुसख्येने इमाम (धार्मिक नेतृत्व-मनुष्यबळ) प्रॉडक्शन केलं आहे, या विषयावर माझे अनेक परप्रांतीय संपर्क-मित्र सहमत आहेत. हे मनुष्यबळ रोजगाराच्या शोधात देशभरात विखुरलं आहे. परिणामी, बहुतांश मस्जिदी यांच्या ताब्यात आहेत. मस्जिदी लोकसपर्क व प्रबोधनाची प्रभावी माध्यमं असतात. त्यामुळे तेथील ताबेदारावर अधिक लक्ष देण्याची गरज असते. मुंबईतील शिवाजीनगर भागात आमचं घर आहे. तेथील बहुतांश मस्जिदी व मदरशांवर उत्तर भारतीय हाफेज, उलेमा व मुफ्तीचा ताबा आहे. हीच स्थिती सध्या मी राहत असलेल्या पुण्यातील कोंढवा भागात आहे. राज्यातही अशीच स्थिती आढळेल. हा वर्ग एकच विचारसरणी म्हणजे, बरेलवीवादी आहे. बाकी ठिकाणी ज्या विचारसरणीचे विश्वस्त, ती व्यावहारिक विचारप्रणाली (देवबंदी, अहले हदीस व इतर) तो स्वीकारतो.

त्यांचं एकमेव भांडवलं म्हणजे, प्रभाव टाकणारे भाषिक कौशल्य होय. ही मंडळी बेरकी असतात. नव्या लोकवस्तीत छोट्याशा खोपटीत असलेल्या मस्जिदीत, हमखास उत्तर भारतीय हाफेज दिसतो. विश्वस्तांशी पटेनाशी झालं तर, तो नवीन विश्वस्त तयार करतो व आपलं नवीन दुकान थाटतो. त्यात आपल्या प्रदेशातील नातलग, वर्गमित्र, संपर्क-मित्रांची शिफारस करुन त्यांनाही रोजगार मिळवून देतो. अशारीतीने प्रत्येक मस्जिद ही, बरेलवी विचारसरणीची झालेली व त्यातील मौलवी उत्तर भारतीय दिसतो.

या मंडळींची बोलीभाषा सरल हिंदी, उर्दू किंवा भोजपुरी, बिहारी असते. त्यांना केवळ उर्दू किंवा हिंदी लिपी येते. मग आपली भाषिक सोय म्हणून ही मंडळी इथल्या स्थानिक समुदायावर उर्दू लादतात. अशारितीने हळूहळू स्थानिक किंवा दखनी बोलीचं उर्दूकरण होत जातं. म्हणजे, प्रादेशिकतेचा एक धागा निसटू लागतो. शिवाय तबलिग-देवबंदीवादात, हा वर्ग आक्रमक व निर्णायक भूमिका बजावतो. त्याची उदाहरणे भिवंडी, नाशिक, मालेगाव ही शहरे आहेत. येथील तबलिग व देवबंदी विचारसरणीचा वाद पोलिसात गेलेला आहे. तबलिगी-बरेलवींनी परस्परांवर फौजदारी प्रकारचे खटले दाखल केलेले दिसतात. मदरसा व पीरांच्या स्मृतिस्थळीदेखील उत्तर भारतीय धार्मिक नेतृत्व शिरलं आहे. तेथील सर्व अधिसत्ता व आर्थिक स्रोत ताब्यात घेऊन, हवा तसा त्याचा वापर सुरु ठेवला आहे. प्रत्येक ठिकाणी निर्णायक भूमिकेत असल्याने, त्यांच्याकडे नेतृत्व आलेलं आहे. या मंडळींना प्रादेशिकतेचा गंध नसतो, किंबहुना तो आपलं (मागास असला तरी) वरीष्ठवर्णीय अभिजन मानस, इथल्या स्थानिकांवर लादण्यासाठी सांस्कृतिक कुरघोड्या करीत राहतो.

कोकणात या वर्गाने गेल्या काही वर्षांत, अनेक सांस्कृतिक अतिक्रमणे केलेली आहेत. त्यात एक भाषिकही आहे. इथंही उत्तर भारतीय हाफेज, आलिमचा भरणा आहे. कोकणी बोली येत नाही म्हणून, त्यांनी उर्दूचा स्वांग रचला. परिणामी, स्थानिक संस्कृतीमध्ये कोकणी भाषा हळूहळू हद्दपार होऊन बोलीभाषेत हिंदोस्तानी-उर्दू स्थिरावत गेली. या वर्गाने सुप्तपणे कोकणी भाषेला बाजूला सारण्याची प्रक्रिया सुरू केली. परप्रांतीय व भाषिक अतिक्रमणामुळे, कोकणातील विवाह विधी, लग्न परंपरा यातील कोकणी ओळख हळूहळू लयास जाऊ लागली. हे फक्त तबलिग चळवळीमुळे घडलेलं नाही; तर, उत्तर भारतीय इमाम त्याला अधिक कारणीभूत आहेत.

हेच सांगली, सातारा, कोल्हापूरमध्ये घडलेलं दिसतं. उत्तर भारतातून येणाऱ्या इमाम-हाफिजने स्थानिकांच्या बोलीत, मराठी व दखनी भाषेच्या शुद्धीकरणाचे प्रयोग राबवून त्यांना उर्दूकडे नेलं आहे. मराठवाड्यातही असंच काहीसं घडलेलं दिसतं. लातूर, नांदेड, परभणी, औरंगाबादच्या ग्रामीण भागातील मुसलमानांची बोली व तिचा हेल वेगळा आहे; पण, आज हा वर्ग हिंदोस्तानी किंवा उर्दूच्या जवळ जाणारी भाषा वापरत आहे. मस्जिदीचा इमाम तर, हमखास उर्दूत बोलतो. जिथं-जिथं हा वर्ग गेला, तिथं तो मस्जिदीच्या मिंबरचं (गर्भगृह) नियंत्रण मिळवतो व हळूहळू आपलं अभिजनछाप राजकारण खेळू लागतो. त्याला महाराष्ट्रातील स्थानिक सांस्कृतिक, लोक-परंपरा, सहजीवन इतर बाबतीत फारसं स्वारस्य नसतं. तो केवळ आपली मिंबर जवळची जागा अधिकाधिक मजबूत करु पाहतो, त्यासाठी तो ट्रस्टींचे भावनिक शोषण करतो. धर्माच्या नावाने सक्ती मांडत राहतो. वेळेप्रसंगी मिंबरवरुन अधिक्षेप घडवणारी वादग्रस्त भाषणे ठोकतो. स्थानिक लोकसंस्कृतीवर टीका करतो. महापुरुषांना परधर्मी संबोधतो, बिगरमुस्लिम समुदायांच्या रिती-रिवाजांची हेटाळणी करतो. वेळप्रसंगी तो शांतता समर्थकही होतो. हिंसा, दंगली, द्वेष गुन्ह्यात कायदेशीर प्रक्रिया राबवण्यापासून रोखतो... अनेकदा तो राजकीय मार्गदर्शकच्या भूमिकेतही येतो. त्यातून उत्तर भारतीय अभिजन राजकारण मराठी प्रदेशात राबवू पाहतो.

सारांश असा की, सुप्त पद्धतीने तो स्थानिक समुदायाला अधिकाधिक आत्मप्रौढी, स्वांतसुखाय, कर्मठ व हेकेखोर बनवितो. समाजात एकसंधता (युनिफॉर्मलिटी) आणण्याचा प्रयत्न करतो. गाव-खेड्यात हा इस्लामी रिवाज नाही म्हणून, समाजाला लोक-संस्कृतीपासून अलग करतो.

धर्म तत्त्वज्ञानाच्या बाबतीत फारसे सुशिक्षित नसलेले ट्रस्टी किंवा इतर जनसमुदाय, त्या मिंबरजवळ बसलेल्या व्यक्तीचं नेतृत्व हळूहळू स्वीकारु लागतात. कारण, तो प्रभावी वक्ता असतो. भावनिक करुन तुम्हाला शरणागत व्हायला भाग पाडतो, तो अधिक चलाख व अतिशहाणा असतो. विश्वस्त व जवळपासच्या मान्यवर लोकांना खिशात घालण्याचे तो पुरेपूर प्रयत्न करत असतो. यासंदर्भात ढाका विद्यापीठाचे प्रा. ताज हाश्मी यांनी 'द ग्लोबल जिहाद' नावाच्या पुस्तकात खूप बारकाईने निरीक्षणे मांडलेली आहेत. पूर्णतः पोटार्थी असलेल्या या मुल्ला-इमामाची भाषणं व उपदेशाचा परिणाम नवयुवकांवर स्वाभाविक होतो. मग, हा घटक हळूहळू स्थानिक समाजाशी असलेली नाळ तोडण्याच्या दिशेने जातो.



आपली खुर्ची मजबूत झाली हे लक्षात येताच, उत्तर भारतीय मौलवी आपलं वर्चस्ववादी सांस्कृतिक राजकारण रेटू लागतो. त्यातून वेगवेगळे प्रकार करतो. (अशा काही मौलवीस पुण्यातील कोंढवा भागात आमच्या संपर्क-मित्रांनी चोप दिलेला आहे. हेच सांगली, सातारा, कोल्हापूरमध्येही घडलेलं आहे.) तबलिग जमातच्या शुद्धीकरण मोहिमेमुळे व इतर धार्मिक जमातच्या एकसंधतेच्या आग्रहामुळे, अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. हा आग्रह केवळ, एकसारख्या दिसण्याचा नसून, स्थानिक मुस्लिम समुदायाला प्रादेशिकता, संस्कृती, लोकपरंपरा व अस्तित्व मुळाशी तोडणारा आहे. ७०-८० वर्षांपूर्वी घडलेल्या शुद्धीप्रक्रियेचे विघातक परिणाम आता, गाव-खेड्यात दिसून येत आहेत. ...पृष्ठ क्र. १५ वर

# कर्मकांडी भक्ती म्हणजे मेंढरांचा मेळा

**वारी काय, कुंभमेळा काय किंवा हजयात्रा काय, सामान्य माणसाच्या घामाचा पैसा सरकारने कुठल्याही धर्माच्या, कुठल्याही धार्मिक कार्याला देण्यास आमचा विरोध आहे...या पेक्षा हे कोट्यावधी रुपये सरकारने शेतकऱ्यांसाठी, शिक्षणासाठी, विद्युत क्षेत्रासाठी वापरणे खचितच योग्य नव्हे काय?**

या वारीमुळे वा कुंभमेळ्यामुळे फायदा होण्याऐवजी तोटेच जास्त आहेत. वारीच्या कालावधीत चंद्रभागा आणि कुंभमेळ्याच्या कालावधीत गंगा नदी जास्त प्रदूषित होते. (या काळात पाण्यात ६०-७०% मल-मूत्र आढळले आहे.) हे घाणरडे पाणी पवित्र म्हणून लोक पितात! याप्रसंगी लाखो-करोडो लोक येतात, त्यामुळे वाहतूक यंत्रणेवर, इतर नागरी सुविधांवर अतिरिक्त ताण पडतो. जीवनावश्यक वस्तूंचा अचानक तुटवडा जाणवतो. पर्यावरणाची हानी होते.

वारी/कुंभमेळा /हजयात्रा येथे होणाऱ्या अलोट गर्दीमुळे कित्येक लोक चिरडून मरतात. उलट अशा ठिकाणी आलेल्या मरणामुळे मोक्ष प्राप्त झाला, असे समजणे हा तर दैवदुर्विलास होय.

कुठलेही धार्मिक कार्य असो, नवरात्र असो, गणपती असो वा मशिदीवरील भोंगे, ध्वनी-प्रदुषण होत असेल तर सगळ्यांनी विरोध करायला पाहिजे. आमचा विरोध ध्वनी प्रदूषणाला आहे, मग तो कुणी कुठल्याही धर्माच्या कर्मकांडाने का होत असेना.

नदीत डुबकी मारल्याने सगळी पापं धुऊन निघतात, हा तर मोठ्ठा विनोद आहे. खरेतर लोकांना खालील प्रश्न पडायला हवेत...



- पापं धुऊन निघतात म्हणजे नक्की काय होते?
- त्यासाठी कोणती रासायनिक क्रिया घडते?
- पापं धुऊन निघाली हे कसे सिध्द करणार?
- जे वारीला/कुंभमेळ्याला जातात ते सगळे पापी असतात का?
- एकदा पापं धुऊन निघाल्यावर पुन्हा पापं करायला मोकळे होता येते का?

**संत तुकारामांनी म्हटलेलच आहे...**

*तुका म्हणे अवघे सोंग । तेथे कैसा पांडूरंग !!*
*आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्या भटा झाली धनी ।।१।।*
*अंतरीं पापाच्या कोडी । वरिवरी बोडी डोई दाढी ।।२।।*
*बोडिलें ते निघालें । काय पालटलें सांग वहिलें ।।३।।*
*पाप गेल्याची खुण । नाहीं पालटले अवगुण ।।४।।*
*भक्तिभावें विण । तुका म्हणे अवघा सीण ।।५।।*
**(अभंग क्र. २८७०)**

**तर संत कबीर म्हणतात...**

*'जत्रा मे फत्रा बिठाया, तीर्थ बनाया पानी;*
*दुनिया भई दीवानी, पैसे की धूलधानी'*

*विशेष सूचना :* आपल्या धर्मातील घाण कचऱ्याच्या डब्यात टाकायला सांगणे ही निंदा नसून, धर्माची स्वच्छता करणे होय. बहुतेक अंधभक्तांना कर्मकांडांकडे भावनिक अंगाने बघत असल्यामुळे ती घाणही त्यांना प्रिय असते, म्हणून ते टीकाकारांना हिंदुद्वेषी, अर्बन नक्षली समजतात आणि हा ''पुरोगामी दहशतवाद'' आहे, अशी बोंब मारतात. पण अंधभक्तांनी एक लक्षात घ्यावे की, चुका करणाऱ्यापेक्षा चुकांवर पाघरूण घालणारे खरे गुन्हेगार असतात.

*...जगदीश काबरे*

# भोंग्यांवरील बंदीचे राजकारण



मशिवरील भोंगे दररोज दिवसातून पाच वेळा प्रत्येकी सुमारे १.५ मिनिटे वाजत असतात. म्हणजे एकूण ७.५ मिनिटेच वाजत असतात. त्यासाठी मशिदीच्या भोग्यांनाही आवाजाची मर्यादा आहे आणि जर ते पाळत नसतील तर, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर लग्ने, हळदीचे कार्यक्रम, वेळोवेळी होणाऱ्या सत्यानारायणाच्या पूजा, तासंतास चालणाऱ्या पहाटेच्या काकड आरत्या, दहीहंडी, गणपती, नवरात्र, दिवाळी, होळी, २५ व ३१ डिसेंबर, १४ एप्रिल, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी असे १२ महिने तेरा त्रिकाळ वाजतच असतात... तासन्तास ढणाणा कोकलत असतात. त्यामुळे माणसे बहिरी तर होतातच; पण, आजारी माणसांना रक्तदाबाचा आणि हृदयविकाराचा झटकाही येऊ शकतो.

हिंदूंना मुसलमानांच्या अजानसाठी वाजणाऱ्या दिवसभरातील फक्त साडेसात मिनिटांच्या भोंग्याचा त्रास होत असेल तर, बाकी सर्व जनतेला वरील तासन्तास चालणाऱ्या हिंदूंच्या कार्यक्रमांचा किती त्रास होत असेल, याची कल्पना करा. तेव्हा लोकानुनय करणारे सरकार सरसकट सर्व धर्मीयांच्या सर्व सणांत वाजणाऱ्या डीजेपासून मशिदीवरील भोंग्यांपर्यंत सगळ्या ध्वनी प्रदूषकांवर कठोरपणे बंदी आणण्याची हिंमत दाखवेल काय?

खरे तर कुराण काळात लाऊडस्पीकरचा शोध लागला नव्हता म्हणून भोंग्यांचा उल्लेख कुराणात नाही. म्हणजे मुस्लिमांनी खरं तर लाऊडस्पीकर मशिदीवर लावताच कामा नये. जर मुस्लिम खरेच अल्लाभक्त असतील तर, त्यांना त्यांच्या नमाजाच्या वेळा माहितच असल्या पाहिजेत. त्यासाठी भोंग्यातून सूचना द्यायची गरज पडू नये.

कारण कोणताच देव लोकांना त्रास देऊन माझा उत्सव साजरा करा म्हणून सांगत नाही. मग माझा धर्म-तुझा धर्म करून अंधभक्त सामान्यांना त्रास देणारी कोणत्याप्रकारची भक्ती करत असतात?

*– जगदीश काबरे*

## मराठीमुस्लीम लोक संस्कृतीवरील, उत्तरभारतीय घाला!

...पृष्ठ क्र. १४ वरुन

गेल्या काही वर्षांत, हे प्रयत्न अधिक जोमाने सुरु आहेत. शत्रुपक्षाला हेच हवं असतं. मुसलमानांना परकीय ठरवणारे जे जे काही घटक असतात, त्याला तो नकळतपणे स्वीकारलेले असते. अशाप्रकारे तोही अभिजनांच्या सांस्कृतिक राजकारणाचा बळी ठरतो.

थोडक्यात, **सारांश रुपाने म्हणता येईल की, केवळ रोजगाराच्या शोधात येणाऱ्या उत्तर भारतीय धार्मिक नेतृत्व, मुल्ला-मौलवीस आवर घातला पाहिजे. मस्जिदीचा इमाम ही, समाजाची गरज आहे. त्यामुळे तो प्रादेशिक असेल, याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. तमिळ प्रदेशात तो तमिळी असावा, गुजरातला गुजराती, आंध्रला तेलुगु; तर, उडीसाला ओडियाभाषी, बांगलाप्रदेश, कर्नाटक इत्यादी भागातही तो स्थानिकच असावा...**

**मराठी प्रदेशात तर विश्वस्त, मान्यवरांनी महाराष्ट्रीय लोकसंस्कृती व परंपरेची जाण असलेल्या, स्थानिक इमामांकडे मस्जिदी व मदरशांचं नेतृत्व सोपवलं पाहिजे. त्यांना इथल्या लोकसंस्कृतीची जाण असते. अशाप्रकारे स्थानिक इमाम, राजकीय-सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अधिक फायदेशीर ठरु शकतो. मदरशातील मुदरीस (शिक्षक) स्थानिक असला; तर, विद्यार्थ्यांना तो अधिकाधिक जनसाक्षर करू शकतो. त्यातून मस्जिदींचं नेतृत्व करण्यासाठी एक प्रगल्भ पिढी तयार होईल.**

(माझ्या अप्रकाशित लेखाचा एक छोटासा तुकडा इथं टाकला आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, विदर्भ, कोकण, मुंबई व पुणे परिसरातील ग्राउंड रिपोर्टच्या आधारे तो लिहिला होता. मुद्दा समजण्यासाठी त्याचा मोठा भाग इथं दिला आहे. यातील काही मते अनेकांना पटणार नाहीत. पण, हीच वस्तुस्थिती आहे. ती ही सांकेतिक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

*....कलीम अज़ीम* (पुणे)
(राहुल पुंगलियाकडून अग्रेषित)

# अध्यक्ष महोदय, यांच्यावर काय कारवाई झाली?

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कारवाई करणार वगैरे म्हणतायत...

का? तर विनोद केले, आक्षेपार्ह विधान केले म्हणून.

बरं मग ही विधाने ज्यांनी केली, त्या सगळ्यांवर वर काय कारवाई झाली? कोणते गुन्हे दाखल केले? काय शिक्षा झाली? न्याय सगळ्यांना समान आहे का?

- शिवाजी महाराज जुने आदर्श. नवीन आदर्श नितीन गडकरी. ....कोश्यारी.
- एकनाथ शिंदे यांचे बंड शिवाजी महाराजांसारखे. ....लोढा
- शिवाजी महाराजांचा जन्म कोकणातला. ... लाड.
- समर्थ के बिना शिवाजी को कौन पूछेगा?. .... कोश्यारी.
- सैनिक त्यांना मुलं झाल्याबद्दल बॉर्डर वर मिठाई वाटतात पण ते वर्षभरात घरी सुद्धा गेलेले नसतात. ...प्रशांत परिचारक.
- सावित्रीबाई १० वर्षांच्या आणि ज्योतिबा १३ वर्षांचे होते. विचार करा लग्नानंतर काय करत असतील, काय विचार असतील?. ....कोश्यारी.
- तुम्ही फक्त सांगा, मुलीला पळवून आणून लग्न लावून देइन. ...राम कदम.
- बलात्कार इंडिया मध्ये होतात, भारतात नाही. ....मोहन भागवत.
- एक लाख टन तूर डाळ खरेदी केली तरी रडतात साले (शेतकरी). ....दानवे.
- शिक्षण घ्यायला परवडत नाही तर, नोकऱ्या करा ना. ....विनोद तावडे.
- (बलात्कारी) ब्राम्हण होते म्हणजे संस्कारी असतील. ...राऊळजी
- राहुल गांधी जर बोलत असेल की, चौकीदार चोर आहे तर तो मादर ** आहे. ...हिमाचल भाजपा. श्री सत्ती
- मायावती ना स्त्री आहेत ना पुरुष. छक्यांपेक्षा वाईट. ...साधना सिंग. आमदार उत्तर प्रदेश.
- राबडी देवी घुंघटमधे (मर्यादेत) राहणेच उत्तम. ...अश्विनी चौबे. केंद्रीय मंत्री.
- मोदी गोरे आहेत. कुमारस्वामी काळे. दिवसातून दहा वेळा अंघोळ केली तरी रेड्यासारखेच दिसणार. ...राजू कागे. बेळगाव.
- स्त्रियांना पुरुषांबरोबर सर्व बाबतीत सामानतेची आवश्यकता नाही. ...भारती शेट्टी.
- राहुल आणि प्रियांका कमांडोजच्या घेराव्यात जन्मले तर, कमांडोच्या घोळक्यातच दूध पाजलं जायचं का?. ...जितू वाघानी. गुजरात भाजपा.
- आम्ही जर रेसिस्ट असतो तर, दक्षिण भारतातल्या काळ्या लोकांना आपलं समजलं असतं का?. ...तरुण विजय.
- वेश्या सुद्धा त्यांच्या पुरुषाला केलेल्या कमिटमेन्ट पाळतात. पण मायावती जास्त पैसे देणाऱ्याला पार्टीची तिकिटं विकते.


...दयाशंकर सिंग. उत्तर प्रदेश भाजपा

- बलात्कार हा सामाजिक गुन्हा आहे जो कधी योग्य तर कधी अयोग्य असतो. सरकार बलात्कार थांबवू शकत नाही. ....बाबुलाल गौर. भाजपा मध्य प्रदेश.
- आमच्याकडे सत्ता आहे, संघटना आहे. आम्ही पोलिसांना बालविवाह थांबवायला देणार नाही. शोभा चौहान. राजस्थान.
- समलैंगिकत्व हा गुणसूत्रीय दोष आहे ज्याचा सोहळा केला जातोय. ...सुब्रमण्यम स्वामी.
- निर्भया : एका छोट्या घटनेची जगभरात जाहिरात झाली. ...अरुण जेटली.
- मुलींनी योग्य परिधान केला तर, मुलं चुकीच्या नजरेने बघणार नाहीत. ....मनोहर लाल खट्टर. हरियाणा मुख्यमंत्री.
- सपना चौधरी ही सोनिया गांधी यांसारखी डान्सर. राहुल गांधी नी तिच्याशि लग्न करावं. ....सुरेंद्र सिंग. आमदार.
- सबरीमाला मंदिरात शिरणाऱ्या स्त्रियांना कापून काढा. थुलसी.
- लहान मुलांवर बलात्कार घृणास्पद आहेत. एक वेळ मुली स्त्रियांवर झालेले समजू शकतो. ....रमेश बैस. खासदार.
- जेव्हा स्त्रिया मर्यादा ओलांडतात, तेव्हा बलात्कार होतात. ....विजयवर्गीय.
- मुद्दाम कोणी बलात्कार करत नाही. चुकून होतात. ....रामसेवक पायक्र. छत्तीसगड
- शेख हसीना 'स्त्री असूनदेखील' दहशतवादाला सहन करत नाहीत. ....मोदी
- काँग्रेसच्या कोणत्या विधवेच्या खात्यात पैसे जातात. ....मोदी.
- पन्नास करोडची गर्लफ्रेंड. (सुनंदा पुष्कर) ....मोदी.
- रेणुका चौधरी ना उद्देशून. रामायणानंतर असलं (राक्षसी) हसणं ऐकलं. ....मोदी
- व्यापारी सैनिकांपेक्षा जास्त धोका उचलतो. ....मोदी.

ही तर फक्त झलक आहे...अजून बरेच आहेत.

*.....सूरज सामंत*

# स्टँडअप कॉमेडियन 'कुणाल कामरा' प्रकरणी, शिवबा-संतांच्या महाराष्ट्राला पडलेले काही प्रश्न....



भाजपाने एकनाथ शिंदेंची औटघटकेच्या मुख्यमंत्रीपदाची खुर्ची, अपमानास्पदरित्या काढून घेतली.....काय वाकडं केलं त्यांचं शिंदेसेनेच्या गुंडांनी?

मुख्यमंत्री होताच एकनाथ शिंदेंचे निर्णय बदलण्याचा सपाटा लावण्यास आणि त्यांचे बगलबच्चे असलेल्या कंत्राटदारांच्या (त्यातला, एक मोठा मासा अजय आशर हजारो कोटी रु. घेऊन परदेशात पळून गेल्याची वदंता आहे) मुसक्या आवळण्यास देवेंद्र फडणवीसांनी सुरुवात केली..... काय वाकडं केलं त्यांचं शिंदेसेनेच्या गुंडांनी?

शरद पवारांकडून फुटून निघण्यापूर्वी एकनाथ शिंदेंच्या बंडाळीनंतर एकनाथ शिंदेंना 'गद्दार' संबोधून तसे पोस्टर (पाठीमागून खंजिराचा वार करणारे) अजित पवार गटाने जागोजागी महाराष्ट्रभरात लावले.....काय वाकडं केलं त्यांचं शिंदेसेनेच्या गुंडांनी?

सध्या अख GROK ला अनेकजण प्रश्न विचारु लागलेत, ''महाराष्ट्रात गद्दार नेता कोण?''...एलिऑन मस्कच्या ऋ्ळजघ ने तत्काळ उत्तर दिलंय, ''एकनाथ शिंदे!''..... काय वाकडं केलं त्या 'एलिऑन मस्क'चं आणि त्याच्या मुंबईतल्या 'टेस्ला-शोरुम'चं शिंदेसेनेच्या गुंडांनी?

शिवछत्रपतींचा व छ. संभाजी महाराजांचा घोर अपमान करणाऱ्या काळी टोपीछाप राज्यपाल 'कोश्यारीपासून कोरटकर'पर्यंतच्या भाजपाई-संघीय धेंडांचं..... काय वाकडं केलं शिंदेसेनेच्या गुंडांनी?

...थोडक्यात, 'भाजपा-महाशक्ति'समोर केवळ नांगी टाकणाऱ्याच नव्हे; तर, थेट लोटांगण घालणाऱ्या... पण, 'स्वाभिमान' गहाण ठेवण्यास ठाम नकार देणाऱ्या एका 'कॉमेडियन'ला धमक्या देण्याची 'कॉमेडी' करणाऱ्या शिंदेसेनेच्या वाचाळवीरांचा आणि कामराच्या स्टुडियोवर हल्लाबोल करणाऱ्या गुंडांचा...शिवबा-संतांच्या स्वाभिमानी-नीतिमान महाराष्ट्राला अभिमान वाटावा की, वाटावी भयंकर लाज...???

*...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०